# प्रकरण - ४

## प्रकरण ४

# विकासात्मक महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजना व कार्यक्रमाचे परीक्षण

विकासात्मक महामंडळे ही जिल्हयातील अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कमकुवत आणि दारिद्रयरेषेअंतर्गत जीवन जगत असणा-या कुटुंबाचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्तर उंचवावा याच मुख्य उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता स्थापन केलेली आहेत. या अंतर्गतच विकासात्मक महामंडळे महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कृत, राज्य पातळीवरील विविध कल्याणकारी योजना व कार्यक्रम राबवित आहेत. शिवाय राष्ट्रीय स्तरावरील, राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती वित्त आणि विकास महामंडळ, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ आणि राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची "वाहिनीकृत यंत्रणा" म्हणून राज्यात आणि राज्याची "वाहिनीकृत यंत्रणा" म्हणून या योजना जिल्हयात राबविण्याचे काम जिल्हयातील ही विकासात्मक महामंडळे करीत आहेत. त्यांच्या योजना व कार्यक्रमाची चर्चा सदरच्या प्रकरणात केली आहे.[१]

### १. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजना

ह्या केंद्र शासन पुरस्कृत महामंडळाच्या योजना आहेत.

जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांच्याकरिता विशेष केंद्रीय अर्थसहाय्यातंर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनामधीलच ५० टक्के अनुदान योजना ही होय.

### १. ५० टक्के अनुदान योजना

या योजनेअंतर्गत जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारक कुटुंबातील व्यक्तींना एखाद्या विशिष्ट प्रकारचा उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी, जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व स्थानीय

पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने लाभधारकांना आर्थिक सहाय्य अथवा महामंडळाच्या योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जात आहे.

या योजनेअंतर्गत किराणा दुकान, गारमेंट शॉप, टेलरिंग शॉप, सायकल दुरुस्ती शॉप, दोन चाकी अथवा चार चाकी वाहन दुरुस्ती शॉप, मेडिकल शॉप, भाजीपाला अथवा फळाचे दुकान, ब्युटी पार्लर, म्हैस, शेळ्या-मेंढ्या पालन, केश कर्तनालय, बांगड्याचे दुकान, टायर दुरुस्तीचे काम, मिठाई दुकान, बांबूपासून गृहोपयोगी वस्तू बनविणे आणि जनरल स्टोअर्स इत्यादी छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे छोटे अथवा मोठे स्वरूपाचे व्यवसाय उभारणीसाठीची लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ४०,०००/- पर्यंतची आहे.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील रक्कमेच्या ५० टक्के रक्कमेचा अथवा जास्तीत जास्त रू. १०,००० पर्यंतचे अनुदान हे महामंडळामार्फत उपलब्ध करून दिले जाते.

बँक कर्ज स्थानिक पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकेतून दिले जाते.

अनुदान वगळता उर्वरित प्रकल्प गुंतवणूक मर्यादेची ५० टक्के रक्कम कर्ज म्हणून बँकामार्फत उपलब्ध करून दिली जाते.

बँकामार्फत देण्यात येणा-या कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे (बँक व्याजदर) व्याजदराची आकारणी केली जाते आणि कर्जाची परतफेड ही लाभधारकाला सर्वसाधारणपणे तीन वर्षाच्या कालावधीत करावी लागते.

केंद्र शासन पुरस्कृत महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत जिल्हयातील लाभधारक कुटुंबातील व्यक्तींना स्वयंरोजगार उभारणीसाठी ५० टक्के अनुदान महामंडळामार्फत, ५० टक्के रक्कम बँक कर्जाद्वारा उपलब्ध करून दिली जात आहे.

या योजनेद्वारा जिल्हयातून दरवर्षी जवळजवळ ८०० ते १२०० अनुसूचित जाती जमाती, नवबौध्द समाजातील लाभधारक कुटुंबातील व्यक्तींना आर्थिक आधार देण्याचे अथवा कुटुंब उभारणीचे काम महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत केले जात आहे.[२]

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय, कोल्हापूर यातून किती लाभार्थींना आर्थिक मदत मिळालेली आहे याच्या आकडेवारीबद्दलचा विचार तक्ता क्रमांक ४.१ मध्ये करूया.

**तक्ता क्रमांक ४.१**

**५० टक्के अनुदान योजना १९७९-८० ते २००४-०५ (विशेष घटक योजना)**

| अ. नं. | वर्ष | उद्दिष्ट | | आर्थिक सहाय्य (रू. लाखात) | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | लाभार्थी | आर्थिक |
| १ | १९७९-८० | - | - | - | - |
| २ | १९८०-८१ | - | - | - | - |
| ३ | १९८१-८२ | - | - | १६०१ | २५.३१ |
| ४ | १९८२-८३ | - | - | ८९२ | १३.३६ |
| ५ | १९८३-८४ | ५०० | ८.५० | १८२० | ३१.६० |
| ६ | १९८४-८५ | १२०० | १९.०० | २६३८ | ५३.६७ |
| ७ | १९८५-८६ | १५०० | ३०.०० | १४४९ | २९.९४ |
| ८ | १९८६-८७ | १२०० | २३.०० | १२०० | २२.९१ |
| ९ | १९८७-८८ | १२०० | २४.०० | १२५२ | २५.३० |
| १० | १९८८-८९ | १२०० | ३०.०० | १४८४ | २४.११ |
| ११ | १९८९-९० | ६२५ | १५.६३ | ९८७ | १७.१४ |
| १२ | १९९०-९१ | १२५० | ३१.२५ | १३३२ | ३३.५१ |
| १३ | १९९१-९२ | १४५० | ७२.५० | १६१५ | ५७.९६ |
| १४ | १९९२-९३ | १९५० | ५७.५० | १३८९ | ४५.५८ |
| १५ | १९९३-९४ | १४२५ | ७१.२५ | १४३४ | ४४.५३ |
| १६ | १९९४-९५ | १७२५ | १०३.५० | ७०६ | २५.२० |
| १७ | १९९५-९६ | १२४५ | ६३.०० | ८२९ | ३५.२९ |
| १८ | १९९६-९७ | ११०० | ६६.०० | ७१८ | ३६.२१ |
| १९ | १९९७-९८ | ११०० | ६६.०० | ७४१ | ३९.७५ |
| २० | १९९८-९९ | ११०० | ६६.०० | ५७१ | २९.०५ |
| २१ | १९९९-२००० | १२०० | १२.०० | ११०७ | ५९.२६ |
| २२ | २०००-०१ | १२०० | ६६.०० | ५५९ | ४०.६१ |
| २३ | २००१-०२ | १२०० | १२०.०० | १०९२ | ९९.६१ |
| २४ | २००२-०३ | १००० | १००.०० | ११४१ | ९४.४७ |
| २५ | २००३-०४ | १००० | १००.०० | ७६३ | ४९.८४ |
| २६ | २००४-०५ | ५७५ | ५७.५० | ८४५ | ५२.१२ |
| | एकूण | २५९३५ | १२०२.६ | २८१६५ | ९८६.३३ |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर, पान नं. १

वरील तक्ता पाहता असे लक्षात येते की, महामंडळाला सुरुवातीची दोन वर्षे (१९७९-८१) शासनामार्फत अनुदान प्राप्त झाले नाही. याबद्दल सध्याचे अधिकारी पंचवीस वर्षापूर्वीच्या शासनाच्या कृतीबद्दल काही सांगू शकले नाहीत. (महामंडळाच्या जिल्हाव्यवस्थापकांनी पुरविलेली माहिती) पण महामंडळाला २५ लाख रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला आणि लाभधारकांना त्याचे वाटप करण्यात आले. मात्र लाभधारकांकडून त्याची वसुली झाली नाही. त्यामुळे शेवटी ते कर्ज माफ करण्यात आले. अशारीतीने पैसे वसूल न करता पूर्णपणे माफ करणे योग्य नाही.

या योजनेअंतर्गत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने सुरुवातीपासून ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत शासनाच्या आर्थिक उद्दिष्टांतर्गत प्राप्त रू. १२०२.६ लाख पैकी रू. ९८६.३३ लाख इतकी रक्कम ही खर्च केली आहे तर भौतिक उद्दिष्ट (लाभधारकांचे) २५८४५ पैकी जिल्हयातील २८१६५ इतक्या लाभधारकांना विविध प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे. आणि आपले उद्दिष्ट साध्य केले आहे. व्यवसाय अथवा उद्योगाच्या अनुषंगाने लाभधारकांचे स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व उभारणीस महामंडळाने मोलाचे सहकार्य केले आहे. म्हणजे हे महामंडळ उद्दिष्ट पूर्ततेसाठी तप्तर आहे असे म्हणायला हरकत नाही.[३]

महामंडळाने जिल्हयातील तालुकानिहाय लाभधारकांना किती प्रमाणात लाभ उपलब्ध करून दिला आहे याची माहिती तक्ता क्रमांक ४.२ च्या आधारे घेऊया.

## तक्ता क्रमांक ४.२

### महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय, कोल्हापूर ५० टक्के अनुदान योजना २००२-०३ ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत तालुकानिहाय वाटप व लाभार्थींची माहिती

| अ. नं. | तालुका | २००२-०३ | | २००३-०४ | | २००४-०५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उद्दिष्ट | साध्य | उद्दिष्ट | साध्य | उद्दिष्ट | साध्य |
| १ | करवीर | १०० | ३४८ | २०० | २२७ | ५० | १८४ |
| २ | कागल | ७५ | ६८ | १०० | ९४ | ५० | २४४ |
| ३ | हातकणंगले | १०० | २०८ | १०० | ६३ | ५० | ४६ |
| ४ | भुदरगड | २५ | ५२ | ५० | ७३ | ५० | ७१ |
| ५ | राधानगरी | ५० | ७६ | ५० | ४९ | ५० | ३९ |
| ६ | पन्हाळा | ५० | ७२ | ५० | ३० | ५० | ४८ |
| ७ | शिरोळ | ५० | ६६ | २०० | ५२ | ५० | ७६ |
| ८ | गडहिंग्लज | ५० | ७१ | ५० | ८६ | ५० | ९१ |
| ९ | आजरा | २५ | ०३ | ५० | १२ | २५ | ०९ |
| १० | शाहुवाडी | २५ | ०४ | ५० | ६३ | ५० | २५ |
| ११ | गगनबावडा | २५ | १० | ५० | ०७ | ५० | ७१ |
| १२ | चंदगड | ५० | ६३ | ५० | ०७ | ५० | ११ |
| | एकूण | ६२५ | १०४१ | १००० | ७६३ | ५७५ | ८४५ |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर, पान नं. ५

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, जिल्हयातील इतर तालुक्याच्या तुलनेत करवीर तालुक्यात महामंडळाला आपले उद्दिष्ट साधण्यास अधिक यश मिळाले आहे. सन २००२ ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत शासनाने निश्चित केलेल्या २२०० लाभधारकांच्या उद्दिष्टापैकी महामंडळाने २६४९ लाभधारकांना योजनेचा लाभ देवून ते उद्दिष्ट साध्य केले आहे.

शासनामार्फत आलेल्या भौतिक उद्दिष्टापैकी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ हे जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लोकसंख्येनुसार आपले भौतिक उद्दिष्ट निश्चित करते आणि ते साध्य करण्यास प्रयत्नरत आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने सन १९९९-२००० ते २००३-०४ पर्यंत जिल्हयातील लाभधारकांच्या मंजूर केलेल्या अर्जांची संख्या व वितरीत केलेल्या अनुदानाच्या रक्कमेबाबतची माहिती तक्ता क्रमांक ४.३ च्या आधारे दर्शविली आहे.[४]

## तक्ता क्रमांक ४.३

### महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने सन १९९९-२००० ते २००३-०४ पर्यंत जिल्हयातील लाभधारकांच्या मंजूर केलेल्या अर्जांची संख्या व वितरीत केलेल्या अनुदानाच्या रक्कमेबाबतची माहिती

**सन १९९९-२०००**

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण प्राप्त अर्ज | समितीने शिफारस केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर प्रलंबित अर्ज | बँकेने नाकारलेले अर्ज | महामंडळाने मंजूर केलेले अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | २१३८ | २१३८ | ११०७ | ५८३ | ४४८ | ११०७ |

**सन १९९९-२०००**

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने प्रत्यक्ष वितरीत केलेले कर्ज रू. | महामंडळाने प्रत्यक्ष वितरीत केलेले अनुदान रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | ११८५२००० | ५९२६००० | ११८५२००० | ५९२६००० |

**सन २०००-०१**

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण प्राप्त अर्ज | समितीने शिफारस केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर प्रलंबित अर्ज | बँकेने नाकारलेले अर्ज | महामंडळाने मंजूर केलेले अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | २०८८ | २०८८ | ९४६ | ७०२ | ४४० | ५५९ |

**सन २०००-०१**

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने प्रत्यक्ष वितरीत केलेले कर्ज रू. | महामंडळाने प्रत्यक्ष वितरीत केलेले अनुदान रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | ८१२२८७० | ४०६१४३५ | ८१२२८७० | ४०६१४३५ |

## सन २००१-०२

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण प्राप्त अर्ज | समितीने शिफारस केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर प्रलंबित अर्ज | बँकेने नाकारलेले अर्ज | महामंडळाने मंजूर केलेले अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | २४६९ | २४६९ | ११९२ | ९६१ | ३१६ | १०९३ |

## सन २००१-०२

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने प्रत्यक्ष वितरीत केलेले कर्ज रू. | महामंडळाने प्रत्यक्ष वितरीत केलेले अनुदान रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | १९९२२००० | ९९६१००० | १९९२२००० | ९९६१००० |

## सन २००२-०३

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण प्राप्त अर्ज | समितीने शिफारस केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर प्रलंबित अर्ज | बँकेने नाकारलेले अर्ज | महामंडळाने मंजूर केलेले अर्ज | महामंडळाने मंजूर केलेले पण अनुदान न दिलेले अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | २४८७ | २४८७ | १३३७ | ५९४ | ५५६ | ११४१ | २९६ |

## सन २००२-०३

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने प्रत्यक्ष वितरीत केलेले कर्ज रू. | महामंडळाने प्रत्यक्ष वितरीत केलेले अनुदान रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | १८८९४००० | ९४४७००० | १८८९४००० | ९४४७००० |

## सन २००३-०४

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण प्राप्त अर्ज | समितीने शिफारस केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर केलेले अर्ज | बँकेकडे मंजूर प्रलंबित अर्ज | बँकेने नाकारलेले अर्ज | महामंडळाने मंजूर केलेले अर्ज | महामंडळाने मंजूर केलेले पण अनुदान न दिलेले अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | २२८३ | २२८३ | ११७२ | ६८३ | ४२१ | ७६३ | ४१६ |
| | | | | | | | | |

## सन २००३-०४

| अ. नं. | योजनेचे नांव | एकूण मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने मंजूर केलेले कर्ज रू. | बँकेने प्रत्यक्ष वितरीत केलेले कर्ज रू. | महामंडळाने प्रत्यक्ष वितरीत केलेले अनुदान रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५० टक्के अनुदान योजना | १०८२४००० | ५८३०००० | १०८२४००० | ४९९४००० |

उपरोक्त तक्ता पाहता असे लक्षात येते की, बँकांनी मंजुरी दिलेल्या अर्जांना विकासात्मक महामंडळानीही मंजुरी देवून लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला. परंतु बहुतेक लाभधारकांना या योनेच्या लाभावाचून वंचित रहावे लागले ते बँकांच्या प्रलंबितेमुळेच. बँका ह्या मुख्यतः पुढील कारणामुळे लाभधारकांची कर्ज प्रकरणे नामंजूर करतात. ती कारणे पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

i) लाभधारकाचा व्यवसाय बँकाना आर्थिकदृष्ट्या प्रबळ न वाटल्यास अशी कर्ज प्रकरणे बँक नामंजूर करते.

ii) लाभधारक करू इच्छित असलेल्या व्यवसायाला वाव नाही असे बँकाना वाटत असल्यास अशा कर्ज प्रकरणांना मंजुरी दिली जात नाही

iii) गावातील लाभधारकाकडून कर्जाची वसुली नसल्यास, त्याच गावातील लाभधारकांची कर्ज प्रकरणे मंजुरीस असल्यास ती नामंजूर केली जातात.

iv) लाभधारकाकडून व्यवसायाच्या अनुषंगाने कोटेशनची पूर्तता बँकेकडे न केल्यास, मंजूरी दिली जात नाही.

v) लाभधारकाकडे व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या जागेचा अभाव असल्यास अशी कर्ज प्रकरणे नामंजूर केली जातात.

vi) लाभधारक करू इच्छित असलेल्या व्यवसायाच्या ज्ञानाचा अभाव लाभधारकाकडे असल्यास बँक सदर कर्ज प्रकरण नामंजूर करते.

vii) लाभधारकाने व्यवसायाच्या प्रमाणापेक्षा अधिक रक्कमेच्या कर्जाची मागणी केली असल्यास बँक अशी कर्ज प्रकरणे नामंजूर करते.

viii) लाभधारकाने बँकाना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता न केल्यास अशी कर्ज प्रकरणे नामंजूर केली जातात.

ix) विकासात्मक महामंडळे ही शासनाकडून आलेल्या उद्दिष्टांच्या प्रमाणात जिल्हयातील प्रत्येक तालुका व गावपातळीवरील राष्ट्रीयकृत बँकांनाही कर्ज मंजूर प्रकरणांची उद्दिष्टे निश्चित करून देते. पण त्यापेक्षा अधिक

कर्ज प्रकरणे ही बँकाकडे मंजूरीसाठी आल्यास बँक अशी कर्ज प्रकरणे प्रलंबित ठेवते.[६]

अशा अनेक कारणांनी बँक ही लाभधारकांची कर्ज प्रकरणे नामंजूर करते. मात्र विकासात्मक महामंडळे ही राष्ट्रीयकृत बँकेने कर्ज प्रकरणे नामंजूर केल्यास त्यात आवश्यक त्या बदलानुसार, लाभधारकांच्या विनंतीनुसार जिल्हयातील अन्य राष्ट्रीयकृत बँकेकडे मंजुरीसाठी पाठविते. आणि अडचणीवर मात करीत आपली वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत आहे या प्रयत्नामध्ये जिल्हयातील लाभधारकांच्या प्रतिसादाची गरजही विकासात्मक महामंडळाला आहे. लाभधारकांच्या प्रतिसादामुळेच विकासात्मक महामंडळे ही विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी अधिक गतिशील, सक्षमपणे करण्याचा प्रयत्न करेल व समाजामध्ये समाविष्ट असलेल्या या विविध जाती जमातीच्या घटकाचा विकास अथवा उन्नती साधण्यास मदत करेल.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत ५० टक्के अनुदान योजना या योजनेअंतर्गत जिल्हयातील वर्षाकाठी जवळजवळ ८०० ते १२०० कुटुंबांना आधार देण्याचे, आर्थिकदृष्ट्या त्यांना सबळ, सक्षम बनवून कुटुंब उभारणीचे काम हे महामंडळ करीत आहे. या योजनेअंतर्गत जिल्हयातील अनेक लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे ते पुढील तक्ता क्रमांक ४.४ मध्ये दर्शविलेले आहे.

**तक्ता क्रमांक ४.४**

**५० टक्के अनुदान योजना लाभार्थींची माहिती**

| अ. नं. | लाभार्थीचे नांव व पत्ता | प्रस्तावामागे एकूण मागणी रू. | बँकेचे मंजूर कर्ज रू. | महामंडळाने मंजूर केलेले अनुदान रू. |
|---|---|---|---|---|
| १ | गौतम अमृता कांबळे<br>रा. कबनूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | २०००० | १०००० | १०००० |
| २ | रमेश रघुनाथ कांबळे<br>रा. सावे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर | २०००० | १०००० | १०००० |
| ३ | कृष्णात आनंदा कांबळे<br>रा. मरळी, ता. करवीर, जि. कोल्हापूर | २०००० | ५००० | ५००० |
| ४ | सतिश सुदाम कांबळे<br>रा. शिरदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | २०००० | ५००० | ५००० |
| ५ | दिनकर राघु जाधव<br>रा. यवलुज, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | २०००० | ५००० | ५००० |

| अ. नं. | लाभार्थीचे नांव व पत्ता | प्रस्तावामागे एकूण मागणी रू. | बँकेचे मंजूर कर्ज रू. | महामंडळाने मंजूर केलेले अनुदान रू. |
|---|---|---|---|---|
| ६ | जोतिबा काळु कांबळे<br>रा. तुर्केवाडी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | २०००० | ५००० | ५००० |
| ७ | नामदेव बाळु कांबळे<br>रा. कडगाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | २०००० | १०००० | १०००० |
| ८ | मोहन ज्ञानू कांबळे<br>रा. गंजीमाळ, जि. कोल्हापूर | २०००० | १०००० | १०००० |
| ९ | सचिन कुमार कांबळे<br>रा. चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | २०००० | १०००० | १०००० |
| १० | राजश्री आप्पासो कांबळे<br>रा. दत्तवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | २०००० | १०००० | १०००० |
| ११ | बेबीताई शंकर नलवडे<br>रा. सावे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर | २०००० | ७००० | ५००० |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर, पान नं. २, ३

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, जिल्हयातील अशा लाभधारक कुटुंबातील महिला अथवा पुरुषांना ते उभा करू इच्छित असलेल्या व्यवसायाच्या अनुषंगाने महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.[७]

## २. प्रशिक्षण योजना

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रशिक्षण योजनेचा लाभ जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारकांना घेता यावा म्हणूनच महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक जिल्हयातून अधिक प्रमाणात प्रसारित होत असलेल्या वर्तमानपत्रातून प्रशिक्षण योजनेबाबतची माहिती देतात. शिवाय महामंडळाच्या योजनांचा लाभ घेवू इच्छिणा-या लाभधारकाजवळ प्रशिक्षणाचा अभाव असल्यास, महामंडळाचे अधिकारी वर्ग या योजनेच्या लाभाविषयी लाभधारकाला प्रेरीत करतात.

वर्तमानपत्रातून, जिल्हा व्यवस्थापकांनी दिलेल्या माहितीद्वारे या योजनेचा लाभ घेवू इच्छिणारी व्यक्ती, प्रशिक्षण विद्यावेतनासाठीच्या अर्जासह, सोबत पुढील कागदपत्रांच्या पूर्ततेसह महामंडळाच्या कार्यालयात आणून सादर करते.

१. जातीचा दाखला

२. शाळेचा दाखला

३. उत्पन्नाचा दाखला : उत्पन्न मर्यादा रू. २२,००० चे आत

जिल्हा व्यवस्थापक व जिल्हा निवड समितीमार्फत त्यांची निवड केली जाते. लाभधारक प्रशिक्षणार्थींच्या नावाची शिफारस ही जिल्हयातील स्थानीय पातळीवरील शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत केली जाते.

अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारक व्यक्ती ही किमान ४ थी पास ते १० वी पास अथवा नापास असूनही शिक्षणावाचून आर्थिक अथवा अन्य कोणत्याही कारणाने वंचित राहिली असल्यास, स्वयंरोजगार उभारणीसाठी आवश्यक असणारे तंत्रविषयक कौशल्याचे ज्ञान त्यांना प्राप्त व्हावे याच हेतूने विविध व्यावसायिक ट्रेडच्या शासनमान्य संस्थामार्फत (३ ते ६ महिन्याचे) मोफत प्रशिक्षण देण्यात येते.

टी. व्ही. रिपेअरिंग, वेल्डींग, दोन चाकी व तीन चाकी वाहन दुरुस्ती, मोटार मेकॅनिक, वाहनचालक, शिवण कला, टंकलेखन, लघुटंकलेखन, संगणक, व्हिडिओ रेडिओ दुरुस्ती, फिटर, ब्युटी पार्लर, विद्युत मोटार वायडिंग व पंपसेट विक्री इ. प्रकारच्या व्यवसायाचे प्रशिक्षण हे लाभधारक विद्यार्थ्यांना महामंडळामार्फत मोफत उपलब्ध करून दिले जाते.

विकासात्मक महामंडळ लाभधारक प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण फी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भरते. ती पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

१. वाहनचालक : प्रति प्रशिक्षणार्थीस संपूर्ण प्रशिक्षणाकरिता रू. १५००/- एवढे भरते.

२. संगणक : प्रति प्रशिक्षणार्थीस सहा महिन्याच्या कोर्सकरिता रू. ५०७५/- एवढे भरते.

३. ब्युटी पार्लर : प्रति प्रशिक्षणार्थीस सहा महिन्याच्या कोर्सकरिता रू. २५००/- एवढे भरते.

याशिवाय सर्वसाधारणपणे प्रशिक्षण फी प्रति उमेदवार सहा महिन्यांच्या अभ्यासक्रमाकरिता रू. २२५०/- पर्यंत भरते.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेणा-या व्यक्तींना शासनमान्य संस्थेत मोफत प्रशिक्षण तर उपलब्ध करून देतेच पण त्याशिवाय प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षणाबरोबरच प्रशिक्षण भत्ता (विद्यावेतन) ही उपलब्ध करून देते. ती पुढीलप्रमाणे आहे.

१. प्रशिक्षणार्थीस राहत्या खेड्यामध्ये अथवा गावामध्ये प्रशिक्षणाची सोय उपलब्ध असल्यास प्रति प्रशिक्षणार्थीस प्रतिमहा रू. १५०/- इतके विद्यावेतन देण्यात येते.

२. दुस-या खेड्यामध्ये अथवा गावामध्ये प्रशिक्षणाची सोय उपलब्ध असल्यास प्रति प्रशिक्षणार्थीस प्रतिमहा रू. ३००/- इतके विद्यावेतन देण्यात येते.

३. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये प्रशिक्षणाची सोय उपलब्ध असल्यास प्रति प्रशिक्षणार्थीस प्रतिमहा रू. २५०/- इतके विद्यावेतन देण्यात येते.

शिवाय प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभधारकांला महामंडळाच्या इतर योजनांचा लाभ घ्यावयाचा असल्यास अथवा या प्रशिक्षणाच्याद्वारे लाभधारकाला स्वयंरोजगाराची उभारणी करावयाची असल्यास, महामंडळ विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत अनुदान व अत्यल्प व्याजदराने अर्थसहाय्य उपलब्ध करून देते.

महाराष्ट्र राज्य टेक्निकल इन्स्टिट्यूशन, कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट, कोकणेज टेक्निकल इन्स्टिट्यूट, श्री. शाहू छत्रपती आय. टी. आय., शिवाजी तंत्र निकेतन, अभिनव टेक्निकल इन्स्टिट्यूट, महाराष्ट्र राज्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था यासारख्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून लाभधारकांना हे प्रशिक्षण मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. त्याची आकडेवारी खालील तक्ता क्रमांक ४.५ मध्ये स्पष्ट होते.[८]

## तक्ता क्रमांक ४.५

### महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय कोल्हापूर प्रशिक्षण योजनेअंतर्गत वर्षनिहाय प्रशिक्षणार्थींची माहिती (२०००-०१ ते २००४-०५)

| अ. नं. | योजना | वर्ष | उद्दिष्ट | | साध्य/ प्रशिक्षणार्थींची संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक (लाखात) | | |
| १ | जनरल प्रशिक्षण | २०००-०१ | १०० | ०६.०० | १०९ | २७२९२० |
| २ | जनरल प्रशिक्षण | २००१-०२ | १०० | ०६.०० | ४६ | १४२७३४३ |
| ३ | जनरल प्रशिक्षण | २००२-०३ | २०० | ०६.०० | १२८ | ४२१००० |
| ४ | जनरल प्रशिक्षण | २००३-०४ | ११० | ५.८३ | १२७ | ६९०००० |
| ५ | जनरल प्रशिक्षण | २००४-०५ | ११० | ५.८३ | ११२ | ४७३००० |
| | एकूण | | ६२० | २९.६६ | ५२२ | १९८४२६३ |

टीप : महामंडळाच्या सुरूवातीपासून २००० पर्यंतची माहिती महामंडळाकडून उपलब्ध होवू शकली नाही.

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास आले की, महामंडळाच्या या योजनेअंतर्गत जिल्हयातील दरवर्षी जवळजवळ १०० ते १२० प्रशिक्षणार्थींना तंत्रविषयक कौशल्याचे, व्यवसायाचे प्रशिक्षण हे पूर्ण करता येते. शिवाय आतापर्यंत या विकासात्मक महामंडळाने १० प्रशिक्षण मोहिमा पूर्ण केल्या आहेत. आणि त्यावरून विकासात्मक महामंडळाच्या असे लक्षात आले की, गरजू लाभधारक प्रशिक्षणार्थींचा कल आधुनिक परिस्थितीत अत्यावश्यक ठरलेल्या संगणक प्रशिक्षणाकडे अधिक आहे.

महामंडळाने या योजनेअंतर्गत सन २०००-०१ पासून ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत जिल्हयातील ५२२ लाभधारकांना वेगवेगळ्या व्यवसायाचे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आहे आणि त्यासाठी शासनामार्फत उपलब्ध निधीपैकी रू. १९,८४,२६३ इतकी रक्कमही खर्च करण्यात आली आहे. या रक्कमेतूनच प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण फी व विद्यावेतनही देण्यात आले.[९]

## ३. केंद्र सरकार पुरस्कृत स्वच्छता काम करणा-या सफाई कामगारांच्या कुटुंबियांसाठी प्रशिक्षण व पुनर्वसन योजना

### अ) प्रशिक्षण योजना

स्वच्छता काम करणा-या लोकसमुदायातील शिक्षणाचे प्रमाण हे अत्यल्प आहे. याचाच परिणाम म्हणून या समाजाला नोकरी, व्यवसाय यामध्ये संधी लाभत नाही तर त्यांना परंपरेने चाल आलेल्या आपल्या जातीचाच व्यवसाय स्वीकारावा लागतो. त्यांची या परंपरेने चालत आलेल्या व्यवसायातून मुक्तता व्हावी, त्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन व्हावे, त्यांना प्रशिक्षणाचा लाभ घेता यावा याच उद्देशाने केंद्र शासनाने सन १९९२-९३ पासून सफाई कामगारांच्या कुटुंबियांसाठी प्रशिक्षण व पुनर्वसन योजना ही महाराष्ट्र राज्यात आणि राज्याची "वाहिनीकृत यंत्रणा" म्हणून जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळात राबविली जात आहे.

सफाई कामगारांच्या कुटुंबियांसाठी प्रशिक्षण योजनेअंतर्गत १६ ते ४० वर्षे वयोगटातील किमान ४ थी पास ते १० वी पास-नापास लाभधारक प्रशिक्षणार्थीस विविध व्यावसायिक ट्रेडच्या शासनमान्य संस्थामार्फत तीन ते सहा महिन्यापर्यंतचे मोफत तंत्रविषयक अथवा व्यावसायिक कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

जनरल प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणाप्रमाणेच ह्याही प्रशिक्षण योजनेअंतर्गत लाभधारकाला मोफत प्रशिक्षण हे उपलब्ध करून दिले जाते. महामंडळ मात्र लाभधारक प्रशिक्षणार्थीची प्रशिक्षण फी ज्या त्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दरमहा रू. ३००/- इतकी भरते. शिवाय प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण कालावधी पूर्ण करेपर्यंतच्या काळात प्रशिक्षण भत्ता (विद्यावेतन) हे प्रति प्रशिक्षणार्थीस प्रतिमहा रू. ५००/- एवढी रक्कमही उपलब्ध करून देते.

शिवाय या प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणा-या प्रशिक्षणार्थीस त्यांनी घेतलेल्या ट्रेडकरीता आवश्यक असणा-या औजारांचे टुलकिटस् (साधनसामग्री) खरेदीकरिता म्हणून महामंडळामार्फत रू. २०००/- पर्यंतचे अनुदानही उपलब्ध करून दिले जात आहे. त्याची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.६ मध्ये दर्शविली आहे.[१०]

### तक्ता क्रमांक ४.६

### महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय कोल्हापूर प्रशिक्षण योजनेअंतर्गत वर्षनिहाय प्रशिक्षणार्थींची माहिती (२०००-०१ ते २००४-०५)

| अ. नं. | योजना | वर्ष | उद्दिष्ट | | साध्य/ प्रशिक्षणार्थींची संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक (लाखात) | | |
| १ | प्रशिक्षण योजना | २०००-०१ | १०० | ०६.०० | ३१ | ४४८८० |
| २ | प्रशिक्षण योजना | २००१-०२ | १०० | ०३.०० | २० | ३३५०० |
| ३ | प्रशिक्षण योजना | २००२-०३ | १०० | ०३.०० | ५९ | २३५००० |
| ४ | प्रशिक्षण योजना | २००३-०४ | १२५ | ०८.५० | ८९ | ५९८००० |
| ५ | प्रशिक्षण योजना | २००४-०५ | १२५ | ०८.५० | १३५ | ६२८००० |
| | एकूण | | ५५० | २९.०० | ३३४ | १५३९३८० |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर, पान नं. ६

वरील तक्त्यातील प्रशिक्षण योजना ही केवळ सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी राबविण्यात येत असलेली योजना आहे. या योजनेअंतर्गत २०००-०१ ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत जिल्हयातील ३३४ लाभधारकांना प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आहे. त्यासाठी महामंडळाने रू. १५,३९,३८० इतकी रक्कम खर्च केली आहे. एका प्रशिक्षणार्थीमागे विकासात्मक महामंडळाला जवळजवळ रू. ४००० ते ५००० खर्च करावे लागले. प्रशिक्षणार्थीचे उद्दिष्ट तुलनेने लाभधारकांची संख्या २०० पेक्षा कमी आहे. म्हणजे जास्तीत जास्त लाभार्थीना प्रशिक्षणाचे प्रयोजन देणेबद्दल सतर्क राहणे गरजेचे आहे हे तक्त्यावरून स्पष्ट होते.

महामंडळाच्या या योजनेअंतर्गत जिल्हयातील दरवर्षी जवळजवळ ३० ते १०० प्रशिक्षणार्थींना तंत्रविषयक कौशल्याचे, व्यवसायाचे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे.[११]

### ब) सफाई कामगारांच्या कुटुंबियांसाठी पुनर्वसन योजना

शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण, शासनामार्फत असलेल्या शैक्षणिक व नोक-यातील सवलतीचा फायदा हा या समाजाला पुरेशा प्रमाणात घेता आला नाही. जिल्हयातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सरकारी हॉस्पिटल्स, कॅन्टोमेंट बोर्ड, नगरपालिका,

रेल्वे व शासकीय कार्यालये यामधून हा सफाई कामगारांचा वर्ग हा चतुर्थ श्रेणीतील कामे करताना आढळते. पण हा शासकीय नोक-यातील वर्ग हा अत्यल्प आहे. बाकीच्या सफाई कामगारांचा वर्ग ह आपल्या उदरनिर्वाहासाठी परंपरागत जातीच्या व्यवसायालाच आपलेसे करतो. परंपरागत व्यवसायाशिवाय इतर प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय करण्यास मदत व्हावी याच उद्देशाने महामंडळ आणि राष्ट्रीयीकृत बँका यांच्यामार्फत सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत इतर योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

जिल्हयातील सफाई कामगारांना अथवा त्यांच्या कुटुंबियांना वरील प्रकारच्या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे छोट्या मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५०,००० पर्यंतची आहे.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या (बँकेने मंजूर केलेल्या रक्कमेच्या) जास्तीत जास्त रू. १०,०००/- पर्यंतचे अनुदान अथवा १५ टक्के किंवा जास्तीत जास्त रू. ७,५००/- पर्यंतचे बीज भांडवल महामंडळामार्फत कर्जरूपाने मंजूर करण्यात येते.

महामंडळामार्फत जास्तीत जास्त रू. १०,०००/- पर्यंतचे अनुदान व जास्तीत जास्त रू. ७,५००/- पर्यंतचे बीज भांडवल कर्ज असे दोन्ही मिळून रू. १७,५००/- पर्यंतची रक्कम महामंडळामार्फत देण्यात येते.

**बँक कर्ज**

महामंडळामार्फत देण्यात येणा-या रू. १७,५००/- ची रक्कम वगळता उर्वरित रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून मंजूर केली जाते.

महामंडळामार्फत देण्यात येणा-या बीज भांडवल कर्जाच्या रक्कमेवरील व्याजदर हा दर साल दर शेकडा ४ टक्के इतका आकारला जातो.

बँकेमार्फत देण्यात येणा-या कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदर हा आकारला जातो.

सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियातील बेरोजगारांना रोजगार अथवा व्यवसाय उभारणीसाठी अनुदान व सवलतीच्या व्याजदराने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सबळ, सक्षम जीवनाचा लाभ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आतापर्यंत महामंडळाने जिल्हयातील किती लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे, त्यासाठी किती रक्कम खर्च केली आहे याचा आढावा तक्ता क्रमांक ४.७ च्या आधारे घेऊया.[१२]

**तक्ता क्रमांक ४.७**

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय कोल्हापूर १९९२-९३ ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत वाटप केलेल्या लाभधारकांची वर्षनिहाय माहिती**

| अ. नं. | वर्ष | उद्दिष्ट | | साध्य (आर्थिक रू. लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | अनुदान | बीजभांडवल |
| १ | १९९२-९३ | १५० | ० | १७ | १.२७ | ०.५० |
| २ | १९९३-९४ | २५० | ० | १२ | १.२० | ०.५३ |
| ३ | १९९४-९५ | १०० | ० | ५ | ०.४५ | ०.२८ |
| ४ | १९९४-९६ | १०० | १७.५० | १८ | १.५२ | ०.५२ |
| ५ | १९९६-९७ | १०० | ९७.५० | २१ | २.०० | ०.६९ |
| ६ | १९९७-९८ | ५० | ८.७५ | ५५ | ५.१८ | १.९७ |
| ७ | १९९८-९९ | ५० | ८.७५ | ७२ | ७.०३ | २.५० |
| ८ | १९९९-२००० | ५० | ८.७५ | ५३ | ५.२५ | २.०९ |
| ९ | २०००-०१ | ६० | १०.१५ | ० | ० | ० |
| १० | २००१-०२ | ६० | १०.५० | २९ | २.९० | १.११ |
| ११ | २००२-०३ | ६० | १०.५० | ३० | ३.०० | १.४१ |
| १२ | २००३-०४ | ६० | १०.५० | २४ | २.४० | ०.६० |
| १३ | २००४-०५ | ३४ | ६.०४ | २६ | २.५४ | १.४३ |
| | एकूण | ११२४ | १८८.९४ | ३६२ | ३४.७४ | १३.६३ |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने दिलेली वर्षनिहाय माहिती, पान नं. ४

वरील तक्त्यात स्पष्ट केलेल्या आर्थिक रक्कमा ह्या अनुक्रमे केंद्रशासनाकडून वीस कलमी कार्यक्रमाअंतर्गत अनुदान रक्कम, राज्य शासनाकडून बीज भांडवल रक्कम

ही महामंडळाला प्राप्त होते. या योजनेअंतर्गत महामंडळाने आपल्या स्थापनेपासून (१९९२-९३) ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत शासनाच्या आर्थिक उद्दिष्टाअंतर्गत प्राप्त रू. १८८.९४ लाख पैकी महामंडळाने अनुदान योजनेवर रू. ३४.७४ लाख, बीज भांडवल योजनेवर रू. १३.६३ लाख एवढी रक्कम खर्च केली. शिवाय या महामंडळाने भौतिक उद्दिष्टांतर्गत ११२४ पैकी केवळ ३६३ लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे. लाभधारकांनी बँकाना आवश्यक असलेल्या कागदपत्राची पूर्तता न केल्याने, तसेच वर वर्णिलेल्या कारणामुळे बँकेनी अधिक कर्ज प्रकरणे प्रलंबित ठेवल्याने विकासात्मक महामंडळाला केवळ ३६२ लाभधारकांचे उद्दिष्ट साध्य करता आले आहे. म्हणजेच उद्दिष्ट साध्य करण्यात हे महामंडळ दुबळे पडले आहे.

महामंडळाने या योजनेअंतर्गत जिल्हयातील वर्षाकाळी जवळजवळ ३० ते ४० कुटुंबियांना अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावण्याचे, कुटुंब उभारण्याचे, आर्थिकदृष्ट्या सक्षम जीवन प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.[१३]

## ५. स्वच्छता सेवा केंद्र (सॅनिटरी मार्ट)

सफाई कामगारांच्या कुटुंबियांतील दोन अथवा दोनपेक्षा अधिक बेरोजगारांची, कुटुंबियांची, नातेवाइकांची, संबंधितांची आणि त्यांनी निर्माण केलेल्या गट अथवा समुहाची, त्यांच्या जातीच्या परंपरागत व्यवसायातून मुक्तता व्हावी, गटातील प्रत्येक व्यक्तीच्या अंगभूत कलागुणांचा, कौशल्यांचा त्यांना उपयोग करून घेता यावा, त्यांच्यामध्ये एकसंघपणाची भावना वाढीला लागून स्वयंरोजगार उभा करता यावा याच उद्देशाने ही स्वच्छता सेवा केंद्र ही योजना राबवित आहे.

कुटुंबियांतील दोन अथवा दोनपेक्षा अधिक जवळजवळ २५ सफाई कामगारांच्या कुटुंबियातील बेरोजगार व्यक्तींनी एकत्रित येऊन गट अथवा समूह स्थापन करून सामूहिक स्वरूपात एखादा व्यवसाय उभा करू शकतात.

स्वच्छता सेवा केंद्र (सॅनिटरी मार्ट) मध्ये सहभागी असलेल्या व्यक्तीची वयोमर्यादा ही १६ ते ४० च्या दरम्यान असल्यास त्यांना व्यवसाय उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. शिवाय व्यवसाय उभारणीसाठी लागणा-या संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षणही देण्यात येते.

या योजनेअंतर्गत इतर वरील प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणाप्रमाणेच शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून तीन ते सहा महिन्याचे मोफत प्रशिक्षण, शिवाय कालावधी संपेपर्यंत प्रतिमहा प्रति प्रशिक्षणार्थीस रू. ५०० इतके विद्यावेतनही उपलब्ध करून दिले जाते तर स्वच्छता सेवा केंद्र या सामूहिक योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीस ठराविक कालावधीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर प्रशिक्षणार्थीना त्यांनी घेतलेल्या व्यावसायिक ट्रेडकरीता म्हणून आवश्यक असलेल्या औजाराचे टूलकिटस (साधनसामग्री) खरेदीकरिता महामंडळामार्फत रू. २००० पर्यंतचे अनुदानही उपलब्ध करून दिले जाते. शिवाय स्वच्छता सेवा केंद्रामध्ये सहभागी सदस्यांना प्रशिक्षणाच्या अनुषंगाने व्यवसाय उभारणीसाठी लागणा-या अर्थसहाय्याची मदत महामंडळ उपलब्ध करून देते.

जिल्हयातील सफाई कामगारांसाठी राबविण्यात येणा-या स्वच्छता सेवा केंद्र या सामूहिक स्वरूपाच्या योजनेअंतर्गत मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५,००,००० पर्यंतची आहे.

स्वच्छता सेवा केंद्रात सहभागी प्रत्येक सदस्याला प्रत्येकी रू. २०,००० प्रमाणे २५ सदस्यांना रू. ५,००,००० पर्यंतचे अर्थसहाय्य देण्यात येते.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

यामध्ये प्रत्येक सदस्याला रू. १०,००० पर्यंतचे अनुदान देण्यात येते.

**कर्ज (महामंडळामार्फत)**

अनुदान वगळता रू. ३,००० पर्यंतचे बीज भांडवल कर्ज हे महामंडळामार्फत देण्यात येते.

**कर्ज** (राष्ट्रीय सफाई कामगार वित्त व विकास महामंडळामार्फत)

बीज भांडवल कर्ज रू. ३,००० वगळता उर्वरित रू. ७,००० पर्यंतचे कर्ज राष्ट्रीय सफाई कामगार वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येते. दोन्ही मिळून रू. १०,०००/- पर्यंतचे कर्ज हे महामंडळाकडून देण्यात येते.

बीज भांडवल कर्जाच्या रक्कमेवर दरसाल दर शेकडा ४ टक्के व्याजदर आकारला जातो. राष्ट्रीय सफाई कामगार वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर दरसाल दर शेकडा ६ टक्के व्याजदर आकारला जातो.

स्वच्दता सेवा केंद्रामध्ये समाविष्ट प्रत्येक सदस्याला व्याजासहित ठरवून दिलेल्या हप्त्यानुसार ३ ते ५ वर्षाच्या कालावधीत कर्जाची परतफेड करावी लागते.[१४]

या योजनेअंतर्गत वरील इतर योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच व्यवसाय उभारणीसाठी हे महामंडळ सामुहिकरित्या मदतही उपलब्ध करून देत आहे. सफाई कामगारांना आर्थिकदृष्ट्या सबळ, समक्ष व स्वावलंबी जीवन उपलब्ध करून देण्याचे काम महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ करीत आहे.

महामंडळाच्या स्थापनेपासून (१९९७-९८) ते २००५ पर्यंत केवळ सात लाभधारकांनाच या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे. .

या योजनेअंतर्गत महामंडळामार्फत बीज भांडवल कर्ज, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळामार्फत अनुदानाशिवाय अत्यल्प व्याजदराने अर्थसहाय्य हे लाभधारकांना उपलब्ध करून दिले जात असल्याने सफाई कामगार या योजनांचा लाभ घेतात. मात्र व्याज आणि कर्ज परतफेडीबाबत ते उदासीन राहतात. यामुळे महामंडळाकडून म्हणावी तशी कर्जाची वसुली होऊ शकली नाही.

या योजनेअंतर्गत लाभ उपलब्ध करून दिलेल्या निव्वळ ७ लाभधारकापैकी १ ते २ लाभधारकांकडून वसुली होऊ शकली. कारण एकाच कुटुंबातील दोन ते तीन जण या योजनेचा लाभ घेणारे होते. त्यामुळे कुटुंबातील एकाकडून संपूर्ण वसुली झाल्यासच दुस-याचे प्रकरण मंजूर केले जाते. म्हणूनच ही वसुली होवू शकली.

या योजनेअंतर्गत जी वसुली आवश्यक होती ती होवू शकली नाही याचाच परिणाम म्हणून सदरच्या योजनेस केंद्र शासनाकडून वेळोवेळी निधी हा उपलब्ध होवू शकला नाही. शिवाय वसुली अभावीही सदर योजनेच्या अंमलबजावणीस महामंडळ असमर्थ ठरत आहे.[१५]

**राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एन. एस. एफ. डी. सी.) यांच्या योजना**

केंद्र शासनाने राष्ट्रीय स्तरावर अनुसूचित जाती जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी अनुसूचित जाती जमाती वित्त व विकास महामंडळाची स्थापना ही केली आहे. त्यांची "वाहिनीकृत यंत्रणा" म्हणून मुंबई आणि मुंबईची "वाहिनीकृत यंत्रणा" म्हणून कोल्हापूर जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ हे कार्य करते.

जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट प्रकारचा उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे लाभधारकांना मुदती कर्ज (टर्मलोन) स्वरूपात आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत आहे.

या योजनेअंतर्गत वरील इतर योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच व्यवसाय उभारणीसाठी महामंडळामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे छोटे अथवा मोठ्या स्वरूपाचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ३० लाखापर्यंतची आहे.

**कर्ज (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणुकीच्या ७५ टक्के पर्यंतचे मुदती कर्ज (टर्म लोन) एन. एस. एफ. डी. सी. मार्फत उपलब्ध करून दिले जाते.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत २० टक्के रक्कमेचे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा अर्जदाराला स्वत:ला करावा लागतो. प्रकल्प गुंतवणूक मर्यादेनुसार दयावा लागणारा व्याजदर, लाभधारकांचा सहभाग हा महामंडळाने निश्चित केलेला आहे. तो पुढील तक्ता क्रमांक ४.८ च्या आधारे दर्शविता येईल.[१६]

**तक्ता क्रमांक ४.८**

**प्रकल्प गुंतवणूक व दयावयाचा व्याजदर**

| प्रकल्प किंमत | व्याजदर | लाभधारकांचा स्वत:चा प्रकल्पातील सहभाग |
|---|---|---|
| रू. १ लाखापर्यंत | ६ टक्के | -- |
| रू. १ लाख ते २.५० लाखापर्यंत | ६ टक्के | २ टक्के |
| रू. २.५० लाख ते ५ लाखापर्यंत | ६ टक्के | ३ टक्के |
| रू. ५ लाखापेक्षा जास्त | ८ टक्के | ५ टक्के |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर, माहितीपुस्तिका पान नं. ८

वरील तक्त्यातून प्रकल्प गुंतवणूक, व्याजदर व लाभधारकांचा सहभाग या बाबी स्पष्ट होतात. शिवाय दहा लाखापुढील कर्ज प्रकरणातील व्याजाचा दर ८ टक्के आहे तर लाभधारकांचा सहभाग ५ टक्के इतका आहे.

महामंडळामार्फत देण्यात येणा-या बीज भांडवल (२० टक्के अर्थसहाय्य) चा व्याज्दर हा द. सा. द. शे. ४ टक्के इतका आहे. मुख्यत्वेकरून मुदत कर्ज योजना व बीज भांडवल योजना या दोन्ही योजना या महामंडळामार्फत राबविल्या जातात आणि या दोन्ही योजनेअंतर्गत जास्तीत जास्त रू. ३० लाखापर्यंतच्या प्रकल्पाचा विचार हे महामंडळ करते.

या योजनेअंतर्गत देण्यात येत असलेल्या कर्जाची परतफेड ही लाभधारकाला पाच वर्षात समान हप्त्यात करावी लागते. आतापर्यंत महामंडळाने उपलब्ध करून दिलेल्या आर्थिक मदतीची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.९ मध्ये दर्शविली आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय कोल्हापूर १९९३-९४ पासून ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत (एन. एस. एफ. डी. सी.) योजनेअंतर्गत वाटप लाभधारकांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्रमांक ४.९**

**सन १९९३-९४ पासून ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत (एन. एस. एफ. डी. सी.) योजनेअंतर्गत वाटप लाभधारकांची माहिती**

| अ. नं. | योजना | लाभधारक संख्या | एकूण कर्ज |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती वित्त व विकास महामंडळ (एन. एस. एफ. डी. सी.) योजना | १६० | रू. २,६५,००,००० |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर दि. २७/१/२००६

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, या योजनेअंतर्गत जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने १९९३-९४ पासून ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत १६० लाभधारकांना विविध उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी कर्ज वितरीत केले आहे आणि त्यासाठी महामंडळाने २ कोटी ६५ लाख रूपये इतकी रक्कम खर्च केली आहे. यामध्ये दर व्यक्तीला सुमारे रू. १,६५,६२५ इतके कर्ज मिळाले.[१७]

## ६. सुक्ष्म पतपुरवठा (मायक्रो फायनान्स)

जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील विशेषत: शहरापासून दूर जिथे जवळपास बँकासारख्या आर्थिक मदतीच्या सोयी, सवलती उपलब्ध नसलेल्या दुर्गम भागातील दारिद्रयरेषेअंतर्गत जीवन जगत असणा-या लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी महामंडळ सुक्ष्म पतपुरवठा (मायक्रो फायनान्स) ही योजना राबवित आहे.

या योजनेअंतर्गत वरील इतर योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत महामंडळ अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील ज्या ठिकाणी पाच किलोमीटर परिसराच्या आत बँका नाहीत अशा परिसरातील गरजू अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारकांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या लहान मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठीची लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २५,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणुकीच्या जास्तीत जास्त रू. १०,००० पर्यंतचे अनुदान महानंडळामार्फत देण्यात येते.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती वित्त व विकास महामंडळ (एन. एस. एफ. डी. सी.) चे मुदती कर्ज**

अनुदान वगळता उर्वरित प्रकल्प गुंतवणूक रक्कम रू. १५,००० एवढे मुदती कर्ज हे अनुसूचित जाती जमाती वित्त व विकास महामंडळामार्फत दिले जाते.

राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ५ टक्के व्याजदर आकारला जातो.

महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे तीन वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.

अनुसूचित जाती जमातीतील अत्यंत गरजवंत बँकासारख्या आर्थिक सोयी उपलब्ध नसलेल्या ठिकाणी या योजनांचा लाभ हे त्यांना वरदान ठरत आहे.[१८]

७. **राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (एन. एस. के. एफ. डी. सी.), नवी दिल्ली यांच्या योजना**

जिल्हयातील सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या परंपरागत व्यवसायातून मुक्तता मिळावी आणि त्यांच्या जीवनाची वाटचाल उज्ज्वल भविष्याकडे व्हावी याच उद्देशाने २४ जानेवारी १९९७ रोजी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आणि त्याद्वारे जिल्हयातील लाभधारकांना विविध प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील (इतर) योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच व्यवसाय उभारणीसाठी महामंडळामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

जिल्हयातील सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांकरीता वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा हो रू. ५ लाख पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**कर्ज (राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९० टक्के पर्यंतचे मुदती कर्ज हे राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ यांच्यामार्फत देण्यात येते.

एन् एस. के. एफ. डी. सी. मार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ६ टक्के व्याजदर आकारला जातो.

**कर्ज (महामंडळाकडून)**

एन. एस. के. एफ. डी. सी. मार्फत देण्यात येणा-या कर्जाची रक्कम वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा बीजभांडवल कर्ज म्हणून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत देण्यात येतो.

महामंडळामार्फत देण्यात येणा-या बीजभांडवल कर्जावर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

**लाभधारकांचा सहभाग**

पाच टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकाला स्वतःला करावा लागतो. शिवाय प्रकल्प गुंतवणूक मर्यादा, त्यानुसार दयावा लागणारा व्याजदर, लाभधारकांचा प्रकल्पातील सहभाग हा महामंडळाने निश्चित केला आहे. तो पुढील तक्ता क्रमांक ४.१० च्या आधारे दर्शविता येईल.

**तक्ता क्रमांक ४.१०**

**प्रकल्प गुंतवणूक मर्यादा, व्याजदर व लाभधारकाचा स्वतःचा सहभाग**

| प्रकल्प गुंतवणूक मर्यादा (किंमत) | व्याजदर | लाभधारकांचा स्वतःचा प्रकल्पातील सहभाग |
|---|---|---|
| रू. २ लाखापर्यंत | ६ टक्के | -- |
| रू. २ लाख ते ५ लाखापर्यंत | ६ टक्के | ५ टक्के |
| रू. ५लाख ते १० लाखापर्यंत | ८ टक्के | ५ टक्के |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर माहितीपुस्तिका पान नं. ९

वरील तक्त्यातून असे लक्षात येते की, रू. २ लाखापर्यंतची गुंतवणूक असलेल्या लाभधारकांस स्वत:चा सहभाग समाविष्ट करावा लागत नाही. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाच्या कर्जाची परतफेड ही महामंडळाने ठरवून दिलेल्या हप्त्याप्रमाणे करावी लागते. यामध्ये महामंडळाने उपलब्ध करून दिलेल्या लाभाची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.११ मध्ये स्पष्ट केली आहे.[१९]

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय कोल्हापूर (एन. एस. के. एफ. डी. सी.) योजनेअंतर्गत महामंडळाच्या १९९७-९८ पासून ते ३१ मार्च २००१ अखेरपर्यंत वाटप, लाभधारक यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्रमांक ४.११**

**१९९७-९८ ते ३१ मार्च २००१ पर्यंतची लाभधारकांची माहिती**

| अ. नं. | योजना | लाभधारक संख्या | एकूण कर्ज |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (एन. एस. के. एफ. डी. सी.) योजना | ५ | रू. १७,३९,००० |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर दि. २७/१/२००६

वरील तक्ता पाहता असे लक्षात येते की, या योजनेअंतर्गत जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने सुरुवातीपासून (१९९७-९८) ते ३१ मार्च २००१ अखेरपर्यंत जिल्हयातील केवळ पाच लाभधारकांना विविध प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी रू. १७ लाख ३९ हजार इतकी रक्कम खर्च केली आहे. यामध्ये प्रत्येक लाभधारकाला ३ लाख रुपयापेक्षा अधिक म्हणजेच जवळजवळ रू. ३,४७,००० इतकी रक्कम देण्यात आली आहे.[२०]

### ९. शैक्षणिक कर्ज योजना (एन. एस. के. एफ. डी. सी.)

जिल्हयातील सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियातील शिक्षणाचे प्रमाण हे अत्यल्प आहे. त्यांच्यातील शिक्षणाचे हे प्रमाण वाढावे. त्यांच्यातील सुशिक्षितांच्या प्रमाणात वाढ व्हावी या हेतूनेच जिल्हयात राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाची शैक्षणिक कर्ज योजना ही राबविली जात आहे.

या योजनेअंतर्गत सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांना पदवी अथवा पदव्युत्तर अभ्यासक्रम, वैद्यकीय पदवी, पदव्युत्तर अभ्यास्क्रम, अभियांत्रिकी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, कायदेविषयक अभ्यासक्रम, कृषी अथवा कृषी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम इ. तांत्रिक, व्यावसायिक अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उच्च शिक्षण घेता यावे यासाठीच राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लाभधारक विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

जिल्हयातील सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांकरिता वरील स्वरूपाचे अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचे उच्चतम शिक्षण घेण्याकरिता लागणा-या खर्चाच्या रक्कमेची मर्यादा ही रू. ३ लाखापर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**कर्ज (राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ)**

शैक्षणिक खर्च रक्कमेच्या ९० टक्के पर्यंतची रक्कम ही राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळामार्फत मुदती कर्ज म्हणून देण्यात येते.

एन. एस. के. एफ. डी. सी. मार्फत देण्यात येणा-या कर्जावर ६ टक्के व्याजदर आकारला जातो.

**कर्ज (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ)**

एन. एस. के. एफ. डी. सी. मार्फत देण्यात येणा-या कर्जाची रक्कम वगळता उर्वरित १० टक्के रक्कमेचे बीज भांडवल कर्ज, अनुदान हे जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत देण्यात येते. अथवा लाभधारक विद्यार्थ्यांना स्वत:चा सहभाग म्हणून १० टक्के रक्कमेचा सहभाग समाविष्ट करावा लागतो.

महामंडळामार्फत देण्यात येणा-या बीज भांडवल कर्जावरील व्याजाचा दर हा द. सा. द. शे. ४ टक्के इतका आकारला जातो.

या योजनेअंतर्गत जिल्हयातील केवळ पाच लाभधारक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यास महामंडळाला यश प्राप्त झाले आहे.[२१]

## १०. सूक्ष्म पतपुरवठा योजना (मायक्रो फायनान्स)(एन. एस. के. एफ. डी. सी.)

सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना वरील इतर योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच व्यवसाय उभारणीसाठी जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लाभधारकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

जिल्हयातील सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना वरील प्रकारचे अथवा अन्य प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २५,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळतात.

**अनुदान (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या जास्तीत जास्त रू. १०,००० पर्यंतचे अनुदान महामंडळामार्फत देण्यात येते.

**राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (एन. एस. के. एफ. डी. सी.) चे मुदती कर्ज**

अनुदान वगळता प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील उर्वरित रक्कम रू. १५,००० चे मुदती कर्ज हे राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून दिले जाते.

मुख्यतः महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ६ टक्के व्याजदर आकारला जातो तर या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे तीन वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाच्या या योजनेअंतर्गत २६ लाभधारकांना विविध प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळाने अर्थसहाय्य प्राप्त करून दिले आहे. आजही ते अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यास तप्तर आहे.[२२]

**राज्य शासन पुरस्कृत योजना**

महाराष्ट्र शासन उपक्रमांतर्गत स्थापीत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणा-या अधिकृत भागभांडवलामधूनच जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ हे जिल्हयात विविध कल्याणकारी योजना राबवित आहे. त्यामधील एक योजना म्हणजेच बीज भांडवल योजना ही होय.

**११. बीज भांडवल योजना**

या योजनेअंतर्गत वरील प्रकारच्या योजनेतील छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसायाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत लहान अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठी जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने लाभधारकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे लहान अथवा मोठ्या स्वरूपाचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २,००,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या जास्तीत जास्त रू. १०,००० पर्यंतचे अनुदान हे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत देण्यात येते.

**बीज भांडवल कर्ज (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या २० टक्के रक्कमेचे कर्ज हे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत बीज भांडवल स्वरूपात देण्यात येते.

बीज भांडवल कर्जाच्या रक्कमेवरील व्याजदर हा द. सा. द. शे. ४ टक्के इतका आहे.

**बँक कर्ज (स्थानिक पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या २० टक्के रक्कमेचे बीज भांडवल कर्ज, अनुदान वगळता उर्वरित ७५ टक्के रक्कम ही जिल्हयातील स्थानिक पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकेमार्फत वितरीत केली जाते.

बँकेमार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेवर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदर आकारला जातो.

बँकेच्या कर्जाची परतफेड ही एकाच वेळेस ठरवून दिलेल्या हप्त्यानुसार ३ ते ५ वर्षे मुदतीच्या कालावधीत करावी लागते.

महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या बीज भांडवल योजनेअंतर्गत महामंडळामार्फत अत्यल्प व्याजदराने बीज भांडवल कर्ज, अनुदान व स्थानिक पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकामार्फत कर्ज अशा तिन्ही घटकामार्फत जिल्हयातील लाभधारकांना उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे. याबाबतची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.१२ मध्ये दर्शविली आहे.[२३]

**तक्ता क्रमांक ४.१२**

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई जिल्हा कार्यालय कोल्हापूर**
**१९७९-८० पासून ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत केलेले वाटप व लाभधारकांची वर्षनिहाय माहिती**

| अ. नं. | वर्ष | उद्दिष्टे | | साध्य | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक/ लाभधारक | अनुदान | बीजभांडवल |
| १ | १९७९-८० | -- | -- | ११ | -- | ०.२० |
| २ | १९८०-८१ | -- | -- | १३८ | -- | १.८० |
| ३ | १९८१-८२ | -- | -- | १४७ | -- | १.९१ |
| ४ | १९८२-८३ | -- | -- | २३६ | -- | १.६३ |
| ५ | १९८३-८४ | २७४ | ६.५६ | १०२ | -- | १.४२ |
| ६ | १९८४-८५ | १०० | २.०० | ५६ | -- | २.०६ |
| ७ | १९८५-८६ | २५० | ३.५० | ४१ | -- | १.५७ |
| ८ | १९८६-८७ | ७७ | ३.०० | ५९ | -- | १.४५ |
| ९ | १९८७-८८ | ५० | २.०० | ४७ | -- | १.७८ |
| १० | १९८८-८९ | ४१ | २.१० | ४४ | -- | १.५१ |
| ११ | १९८९-९० | २१ | १.१८ | ७० | -- | २.३२ |
| १२ | १९९०-९१ | ५१ | ४.२८ | ५४ | -- | ३.०६ |
| १३ | १९९१-९२ | ५० | ४.३५ | ५० | -- | ४.३२ |

| अ. नं. | वर्ष | उद्दिष्टे | | साध्य | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक/ लाभधारक | अनुदान | बीजभांडवल |
| १४ | १९९२-९३ | ५० | ४.०० | ४८ | -- | ४.९८ |
| १५ | १९९३-९४ | १०५ | ८.४० | ४६ | -- | ४.०४ |
| १६ | १९९४-९५ | १२५ | ४.६९ | ५२ | ०.९० | २.६३ |
| १७ | १९९५-९६ | १२५ | ४६.०८ | ८५ | ४.९२ | ५.७५ |
| १८ | १९९६-९७ | १२५ | ४२.५० | ६७ | ४.०२ | ६.९१ |
| १९ | १९९७-९८ | १२५ | ४२.५० | ६७ | ४.०२ | ६.९१ |
| २० | १९९८-९९ | १२५ | ४२.५० | ८४ | ४.६२ | ९.०० |
| २१ | १९९९-२००० | १२५ | २२.१२ | २५ | २.०२ | २.५२ |
| २२ | २०००-०१ | ७५ | ३०.०० | १७ | १.३८ | २.०१ |
| २३ | २००१-०२ | ७५ | ३०.०० | २८ | २.७८ | ३.२१ |
| २४ | २००२-०३ | ७५ | ३०.०० | ३० | १.४१ | ३.०० |
| २५ | २००३-०४ | १५० | १०.५० | २४ | २.२८ | ३.२३ |
| २६ | २००४-०५ | ५७ | १२२.५५ | ६६ | ६.२८ | २९.६६ |
| | एकूण | २२५१ | ४३२.३ | १६६७ | ३२.६७ | १०६.०६ |

संदर्भ : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने दिलेली वर्षनिहाय माहिती

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, महामंडळाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजेच १९९४-९५ पर्यंतच्या काळात ही योजना बीज भांडवल कर्ज योजना म्हणून राबविली जात होती. परंतु सन १९९४-९५ पासून विकासात्मक महामंडळाने या बीज भांडवल योजनेअंतर्गत लाभधारकांना अनुदान उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. १९९४-९५ पासून महामंडळ लाभधारकांना बीज भांडवल रक्कमेच्या बरोबरच अनुदानाची रक्कमही उपलब्ध करून देत आहे. भौतिक उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी या महामंडळाने थोडे जास्त प्रयत्न करणे गरजेचे आहे हे तक्त्यावरून स्पष्ट होते.

बीज भांडवल योजनेअंतर्गत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने सुरुवातीपासून ३१ मार्च २००५ पर्यंत शासनाच्या आर्थिक उद्दिष्टांतर्गत प्राप्त रू. ४३२.३ लाख पैकी महामंडळाने अनुदान योजनेवर रू ३२.६७ लाख तर बीज भांडवल योजनेवर रू. १०६.०६ लाख इतकी रक्कम खर्च केली आणि १६६७ लाभधारकांना या बीज भांडवल योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला. बँकाकडूनच्या प्रलंबित कर्ज प्रकरणामुळे विकासात्मक महामंडळाला शासनाकडून आलेल्या उद्दिष्टापैकी (२२५१ लाभधारकांच्या) ५८४ लाभधारकांचे उद्दिष्ट हे साध्य करता आले नाही.

जिल्हयातील वर्षाकाठी जवळजवळ १०० ते १५० लाभधारक कुटुंबियांना रोजगार, व्यवसाय उभारणीसाठी, व्यवसायवृध्दीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावून कुटुंब उभारणीचे, सबळ, सक्षम, स्वावलंबी जीवनाचा लाभ प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम जिल्हयातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ करीत आहे.[२४]

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजना**

**महाराष्ट्र शासनाअंतर्गत महामंडळाच्या योजना**

जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) याकरिता महाराष्ट्र शासनाच्या विशेष अर्थसहाय्यांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनामधील एक योजना म्हणजेच बीज भांडवल कर्ज योजना ही होय.

१. **बीज भांडवल योजना**

जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना या योजनेअंतर्गत स्वतःचा स्वतंत्र असा एखाद्या प्रकारचा उद्योग अथवा व्यवसाय उभा करावयाचा असल्यास त्यासाठी आवश्यक असलेले भांडवल (आर्थिक सहाय्य) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ हे बीज भांडवल कर्ज योजना या अंतर्गत उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका आणि जिल्हयातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या योजनेचा लाभ जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना उपलब्ध करून दिला जात आहे.

या योजनेअंतर्गत वाहन खरेदी, (ट्रक्स, टेंपो, मिनीरिक्षा, ऑटोरिक्षा इ.), किराणा दुकान, गारमेंट शॉप, टेलरिंग शॉप, सायकल दुरुस्ती शॉप अथवा दोन चाकी व चार चाकी वाहन दुरुस्ती शॉप, मेडिकल शॉप, पान शॉप अथवा भाजीपाला, फळाचे दुकान तसेच शेळ्या-मेंढ्या, म्हैशी बैलजोडी खरेदी, फॅब्रीकेशन, क्रेन व्यवसाय,

घोंगड्या विकणे इ. सारखे छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ बीज भांडवल कर्ज योजना या अंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. पाच लाख पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**बँकेचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ७५ टक्के सहभाग हा जिल्हयातील स्थानिक पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकेचा असतो. प्रकल्प गुंतवणूक मर्यादा व बँकांचा सहभाग हा महामंडळाने निश्चित केलेला आहे. तो पुढील तक्ता क्रमांक ४.१३ च्या आधारे स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्रमांक ४.१३**
**प्रकल्प गुंतवणूक मर्यादा व बँकांचा सहभाग**

| प्रकल्प गुंतवणूक मर्यादा | बँकाचा सहभाग |
|---|---|
| रू. २ लाखापर्यंत | १ लाख ५० हजार |
| रू. ३ लाखापर्यंत | २ लाख २५ हजार |
| रू. ४ लाखापर्यंत | ३ लाख |
| रू. ५ लाखापर्यंत | ३ लाख ७५ हजार |

**संदर्भ : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर माहितीपुस्तिका, पान नं. ३**

**महामंडळाचा सहभाग**

वरील तक्त्यात दर्शविलेल्या प्रमाणातील बँकेचा सहभाग वगळता उर्वरित प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या २५ टक्के रक्कमेचा सहभाग हा वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

बँकेमार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर हा आकारला जातो. बँक व महामंडळामार्फत देण्यात आलेल्या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे पाच वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.

समाजातील कोणत्याही विधायक व विघातक गोष्टीचे सोयरसुतक न बाळगता उपजीविकेच्या साधनासाठी वणवण भटकणारा हा भटका समाज या समाजाला स्वत:चा असा उद्योग अथवा व्यवसाय उभारता यावा याकरिता महामंडळ ज्यांना अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे. यामध्ये महामंडळाने उपलब्ध करून दिलेल्या अर्थसहाय्याचा आढावा तक्ता क्रमांक ४.१४ च्या आधारे घेऊया.[२५]

**तक्ता क्रमांक ४.१४**

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय कोल्हापूर महामंडळाच्या १९८४-८५ पासून ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत बीजभांडवल योजनेच्या अंतर्गत लाभधारकांना वाटप केलेली कर्जाची वर्षनिहाय माहिती**

| अ. नं. | योजना | लाभधारक संख्या | महामंडळ बीजभांडवल कर्ज (२५ टक्के) | बँक कर्ज (७५ टक्के) | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| १ | बीजभांडवल योजना | ९६१ | रू. ५४,२२,८७० | रू. १,६२,६८,६१० | रू. २,१६,९१,४८० |

संदर्भ : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाने दिलेली वर्षनिहाय माहिती

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, या योजनेअंतर्गत महामंडळाच्या १९८३-८४ पासून ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत महामंडळाने जिल्हयातील ९६१ लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे. यासाठी महामंडळामार्फत २५ टक्के बीज भांडवल कर्ज म्हणून रू. ५४,२२,८७० इतकी रक्कम, बँक कर्ज ७५ टक्के अंतर्गत रू. १,६२,६८,६१० इतकी रक्कम ही खर्च केली आहे. यामध्ये महामंडळामार्फत प्रत्येक लाभधारकांना स्वत:चा उद्योग, व्यवसाय उभारणीस, समाजात स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व उभारणीस महामंडळ हे सहाय्यभूत ठरले आहे. महामंडळाने प्रत्येक लाभधारकांना किमान रू. ५,००० व त्यापेक्षा अधिक रक्कमेचे कर्ज हे उपलब्ध करून दिले आहे. यामध्ये या योजनेअंतर्गत जिल्हयातील अनेक लाभार्थींनी या योजनेचा लाभ घेतला आहे. ते सामान्यत: पुढील तक्ता क्रमांक ४.१५ प्रमाणे वर्णन करता येईल.

**तक्ता क्रमांक ४.१५**

**महामंडळाच्या योजनेचा लाभ घेणा-या लाभार्थींची माहिती**

| अ. नं. | लाभार्थीचे नांव व पत्ता | व्यवसाय | महामंडळामार्फत २५ टक्के रक्कमेचे कर्ज वाटप |
|---|---|---|---|
| १ | युवराज भगवान चव्हाण<br>रा. रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | मसाला विक्री | रू. ८७५० |
| २ | नारायण शिवाप्पा हराळे<br>रा. हेर्ले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | मेढपाळ | रू. ६२५० |
| ३ | संजय शामराव गोसावी<br>रा. शिवनाकवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | सायकल दुकान | रू. ५००० |
| ४ | लक्ष्मण पुंडलिक भोई<br>रा. मुरगुड, ता. कागल, जि. कोल्हापूर | पानशॉप | रू. ५००० |
| ५ | महादेव भागोजी नांगनूरकर<br>रा. खन्नेरी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | किराणा दुकान | रू. ६२५० |
| ६ | विजय श्रीपतराव नाळे<br>रा. १०५, सी, रविवार पेठ, कोल्हापूर | रिक्षा | रू. १७७५० |
| ७ | बाजीराव यल्लाप्पा नंदीवाले<br>रा. खुपिरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर | दुग्ध व्यवसाय | रू. ६२५० |
| ८ | मारूती गणपती माने<br>रा. कडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | किराणा दुकान | रू. ८७५० |
| ९ | मारूती दुर्गाप्पा वाजंत्री<br>रा. लिंगनूर, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | टेलरिंग | रू. ८७५० |
| १० | सत्याप्पा बाळु कांडगावे<br>रा. राशिवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | मेंढपाळ | रू. ८७५० |
| ११ | तानाजी शामराव गोसावी<br>रा. हारूगडेवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर | दुग्ध व्यवसाय | रू. ६२५० |
| १२ | आनंदा भाऊ पोवार<br>रा. यादवनगर, कोल्हापूर | फॅब्रीकेशन | रू. ८७५० |

संदर्भ : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, कोल्हापूर

वरील तक्त्यातील लाभधारकांप्रमाणेच इतर अनेक लाभधारकांनाही महामंडळाने या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे. या योजनेअंतर्गत जिल्हयातील दरवर्षी जवळजवळ १०० ते १५० लाभधारकांना अर्थसहाय्यरुपी मदतीचा हातभार लावून कुटुंब उभारणीचे, आर्थिकदृष्ट्या सबळ, सक्षम पायावर उभारणीचे महत्त्वपूर्ण काम हे महामंडळ जिल्हयात पार पाडीत आहे.[२६]

## २. थेट कर्ज योजना

जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक व्यक्तींना स्वतंत्र असा उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळामार्फतच थेट कर्जाची रक्कम ही उपलब्ध करून दिली जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील इतर योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे थेट कर्ज योजनेद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २५,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील संपूर्ण रक्कम ही महामंडळामार्फत कर्ज म्हणून उपलब्ध करून दिली जाते.

महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर महामंडळ केवळ २ टक्के व्याजदराची आकारणी करते.

या समाजातील अशिक्षित समाजाला बँकांच्या व्यवहाराची पूर्तता करण्यात, कर्ज मिळविण्यासाठी जी दगदग करावी लागते त्यातून त्यांची मुक्तता व्हावी म्हणूनच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे. ते तक्ता क्रमांक ४.१६ मध्ये दर्शविलेले आहे.[२७]

**तक्ता क्रमांक ४.१६**

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंळ मर्यादित जिल्हा कार्यालय, कोल्हापूर २००३-०४ पासून ते २००५-०६ अखेरपर्यंत वाटप व लाभार्थींची माहिती**

| अ. नं. | योजना | वर्ष | एकूण लाभधारक | वाटप रक्कम रूपये लाखात |
|---|---|---|---|---|
| १ | थेट कर्ज योजना | २०३-०४ ते २००५-०६ | १८६ | ४६.५० |

संदर्भ : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, कोल्हापूर पान नं. २

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, या योजनेअंतर्गत महामंडळाने १८६ लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे. यासाठी महामंडळाने रू. ४६,५०,००० इतकी रक्कमही लाभधारकांना वाटप केली आहे. यामध्ये प्रत्येक लाभधारकाला रू. २५,००० चे थेट कर्ज देण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत जिल्हयातून जवळजवळ ६० ते ८० लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना जीवनाचा कणा मानलेल्या आर्थिक घटकाद्वारे सक्षम, सबळ, जीवनाचा लाभ उपलब्ध करून देण्याचे काम जिल्हयातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ करीत आहे.[२८]

## ३. नोंदणीकृत सहकारी संस्थांचे भाग खरेदीकरिता अर्थसहाय्य योजना

या योजनेअंतर्गत जिल्हयातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने या योजनेचा लाभ लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना उपलब्ध करून दिला जात आहे.

या योजनेअंतर्गत सहकारी बॅका, सहकारी विपनन संस्था, सहकारी पतसंस्था, सहकारी खरेदी विक्री संघ, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी दुग्धसंस्था, सहकारी शेतकरी संघ, सहकारी ग्राहक भांडार, सहकारी तंबाखू खरेदी विक्री संघ, सहकारी भाजी खरेदी विक्री संघ, सहकारी गृहनिर्माण संस्था, पतपुरवठा संघ इ. स्वरूपाच्या सहकारी तत्त्वावर चालणा-या संस्था, संघ व कारखान्याचे भाग (शेअर्स) खरेदीकरिता जिल्हयातील महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारच्या सहकारी संस्था, संघ व कारखान्याचे भाग (शेअर्स) खरेदीकरिता लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही मुख्यत: रू. २००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

### अनुदान (महामंडळामार्फत)

सहकारी साखर कारखान्याच्या रू. २०० किंमतीच्या, सहकारी सूतगिरणीच्या रू १००० किंमतीच्या भाग (शेअर्स) खरेदीकरिता एक भागाच्या किंमतीच्या ५० टक्के अनुदान महामंडळामार्फत देण्यात येते.

**बँक कर्ज (स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँक)**

सहकारी साखर कारखान्याच्या रू. २००० किंमतीच्या, सहकारी सूतगिरणीच्या रू. १००० किंमतीच्या भाग खरेदीकरिता एक भागाच्या किंमतीच्या ५० टक्के अनुदान वगळता उर्वरित ५० टक्के रक्कमेचा सहभाग हा बँकामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

याशिवाय गृहनिर्माण, पतपुरवठा व उपभोग्य वस्तू विक्री सहकारी संस्था याव्यतिरिक्त इतर उत्पादन सहकारी संस्थांचे रू. २०० कमाल मर्यादेपर्यंत किंमतीच्या एका भाग खरेदीकरिता महामंडळामार्फत ४ टक्के व्याजदराने थेट कर्ज पुरवठा केला जातो. जेणेकरून लाभधारक व्यक्तीला छोट्या मोठ्या सहकारी संस्थांचे एक घटक बनत येईल.[२९]

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना**

राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या विविध कल्याणकारी योजनांची "अधिकृत वाहिनी" म्हणून या योजना राज्यात राबविण्याचे आणि राज्याची "अधिकृत वाहिनी" म्हणून या योजना जिल्हयात राबविण्याचे काम वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ करीत आहे.

**१. मुदती कर्ज योजना**

या योजनेअंतर्गत जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट स्वरूपाच्या व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी जिल्हयातील महामंडळ, राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मुदती कर्ज योजनेअंतर्गत लाभधारकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत आहेत.

या योजनेअंतर्गत वरील बीज भांडवल अथवा थेट कर्ज योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे मुदती कर्ज योजनेद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठीची लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५,००,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ८५ टक्के रक्कमेचा सहभाग राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो. प्रकल्प गुंतवणूक मर्यादा व राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग हा महामंडळाने निश्चित केलेला आहे. तो पुढील तक्ता क्रमांक ४.१७ च्या आधारे स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्रमांक ४.१७**

**प्रकल्प गुंतवणूक मर्यादा व राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

| प्रकल्प गुंतवणूक मर्यादा | राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ |
|---|---|
| रू. २ लाखापर्यंत | १ लाख ७० हजार |
| रू. ३ लाखापर्यंत | २ लाख ५५ हजार |
| रू. ४ लाखापर्यंत | ३ लाख ४० हजार |
| रू. ५ लाखापर्यंत | ४ लाख २५ हजार |

संदर्भ : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, कोल्हापूर माहितीपुस्तिका पान नं. ४

**महामंडळाचा सहभाग**

वरील तक्त्यात दर्शविलेल्या प्रमाणातील राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या १० टक्के रक्कमेचा सहभाग हा महामंडळामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर ६ टक्के व्याजदर आकारला जातो.

जिल्हयातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे पाच वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.[३०]

## २. बीज भांडवल कर्ज योजना

जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट स्वरूपाच्या व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी, जिल्हयातील महामंडळ, राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ आणि स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने बीज भांडवल कर्ज योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २,००,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**बँकांचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ५० टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकांचा असतो.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ**

बँकांचा सहभाग वगळता प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ४० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

**महामंडळाचा सहभाग**

बँकांचा आणि राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ यांचा सहभाग वगळता केवळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा महामंडळाचा समाविष्ट असतो.

**लाभधारकांचा सहभाग**

बँक, राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांचा सहभाग वगळता उर्वरित केवळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग लाभधारकांना स्वत:ला करावा लागतो.

बँकामार्फत देण्यात येणा-या कर्जावर बँक आपल्या नियमाप्रमाणे व्याजदराची आकारणी करते.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ६ टक्के व्याजदर आकारला जातो.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

महामंडळ आणि बँकामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे पाच वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.

## ३. शैक्षणिक ऋण योजना

या योजनेअंतर्गत जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन, उच्च अथवा तंत्रविषयक शिक्षण प्रशिक्षणाकरिता आवश्यक असलेले अर्थसहाय्य हे जिल्हयातील महामंडळ व राष्ट्रीय स्तरावरील महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उपलब्ध करून देत आहे.

विद्यार्थी हा आय. सी. टी. ई अथवा भारतीय चिकित्सा परिषदेसारख्या मान्यताप्राप्त संस्थेचा असावा. त्याला उच्च शिक्षण, तंत्रविषयक प्रशिक्षण घेण्याकरिता आवश्यक असलेल्या खर्चाच्या जास्तीत जास्त मर्यादा ही रू. ७५,००० प्रतिवर्षी वा संपूर्ण कोर्सकरिता जास्तीत जास्त रू. ३,००,००० पर्यंतची मर्यादित असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

### राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ सहभाग

विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रशिक्षणाकरिता प्रतिवर्ष वा संपूर्ण कोर्सकरिता आवश्यक असलेल्या खर्चाच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा महामंडळाचा असतो.

### वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचा सहभाग राष्ट्रीय

मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रशिक्षणाकरिता प्रतिवर्ष वा संपूर्ण कोर्सकरिता आवश्यक असलेल्या खर्चाच्या निव्वळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा महामंडळाचा असतो.

**लाभधारकांचा सहभाग**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांचा सहभाग वगळता विद्यार्थ्याच्या शिक्षण प्रशिक्षणाकरिता प्रतिवर्ष व संपूर्ण कोर्सकरिता आवश्यक असलेल्या खर्चाच्या निव्वळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारक विद्यार्थ्याला स्वत:ला कराला लागतो.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ आणि जिल्हयातील महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

**कर्ज परतफेड**

महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे शिक्षण प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर करता येते. तसेच स्वयंरोजगार प्राप्त झाल्यानंतर पाच वर्षाच्या कालावधीत मासिक हप्त्यातही करता येते.[३१]

**स्वयंसक्षम योजना**

जिल्हयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना आर्थिकदृष्ट्या इतरांवर अवलंबून रहावे लागू नये तर त्यांना एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी जिल्हयातील महामंडळ हे स्वयंसक्षम योजना अंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ जिल्हयातील महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या योजनांचा लाभ लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना उपलब्ध करून दिला जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील प्रकारच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही. रू. ५,००,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा आहे.

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा महामंडळाचा असतो.

**लाभधारकांचा सहभाग**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकाला स्वतःला करावा लागतो.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर अनुक्रमे द. सा. द. शे. ५ टक्के व ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

दोन्ही महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे पाच वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.[३२]

**५. नवीन स्वर्णिमा योजना (फक्त महिलांकरिता)**

महिलांच्या कलागुण कौशल्याला वाव देण्याचे, त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देवून स्वावलंबी, सबळ, सक्षम जीवनाचा लाभ उपलब्ध करून देण्याचे काम राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने केले जात आहे.

या योजनेअंतर्गत जिल्हयातील लाभधारक महिलांना दोर वळणे, सूत कातणे, घोंगड्या विणणे, विड्या बांधणे, भांडी विकणे, बांगड्या विकणे, रेडिमेड कपडे विकणे, शेळ्या-मेंढ्या, गाई-म्हशी इ. जनावरे पाळणे, टेलरिंग काम करणे, शेतीसाठी आवश्यक खुरपी-कोयता इ. सारखी लहानसहान हत्यारे बनविणे यासारख्या कुटुंब पातळीवर चालणा-या कुटीर उद्योगांना अथवा लघु उद्योगांना महामंडळ हे स्वर्णिमा योजनेद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक महिलांना वरील प्रकारच्या अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या उद्योग उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५०,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९५ टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील महामंडळाचा असतो.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

दोन्ही महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे पाच वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.[33]

## ६. मायक्रो क्रेडिट योजना (एन. जी. ओ.) Non Government Organization सेवाभावी संस्था

या योजनेअंतर्गत जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी, स्थानिक पातळीवरील (एन. जी. ओ.)

स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून म्हणजेच अशासकीय वित्तीय संस्थेच्यामार्फत दुर्बल घटकांना अर्थसहाय्य पुरविले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील प्रकारच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी महामंडळ हे मायक्रो क्रेडिट योजनेद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारच्या अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २५,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचा सहभाग**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित रक्कमेच्या सहभागापैकी केवळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचा असतो.

**लाभधारकांचा सहभाग**

दोन्ही महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकांला स्वतःला करावा लागतो.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर अनुक्रमे ५ टक्के व ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

दोन्ही महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे पाच वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.[३४]

## ७. महिला समृध्दी योजना (महिलांकरीता)

या योजनेअंतर्गत जिल्हयातील लाभधारक महिलांना एखाद्या विशिष्ट स्वरूपाच्या व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी जिल्हयातील महामंडळ व राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला समृध्दी योजना या योजनेअंतर्गत केवळ महिलांकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत लाभधारक महिलांना वरील नवीन स्वर्णिमा योजनेअंतर्गत छोट्या मोठ्या स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक महिलांना वरील प्रकारच्या अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही. रू. २५,००० पर्यंतची असल्यास खालीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९५ टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचा सहभाग**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील महामंडळाचा असतो.

वरील दोन्ही महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे पाच वर्षाच्या कालावधीमध्येच करावी लागते.[35]

## ८. दीनदयाल लघु ऋण योजना

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (अपंग) यांना आपल्या अपंगत्वामुळे इतरांवर अवलंबून रहावे लागू नये. स्वतःचा स्वतंत्र असा उद्योग अथवा व्यवसाय उभारता यावा तसेच त्यांना आर्थिकदृट्या सबळ, सक्षम, स्वयंपूर्ण स्वरूपाच्या जीवनाचा लाभ उपलब्ध

करून दयावा यासाठी जिल्हयातील महामंडळ व राष्ट्रीय स्तरावरील महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लाभधारक व्यक्तींना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील प्रकारच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी महामंडळ हे दीनदयाल लघु ऋण योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्तींना वरील प्रकारच्या अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. १०,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९५ टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचा सहभाग**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील महामंडळाचा असतो.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर अनुक्रमे ५ टक्के व ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

**९. प्रशिक्षण योजना**

जिल्हयातील लाभधारक विद्यार्थ्यांना शिक्षण प्रशिक्षणाची विशेष आवड असल्यास, किमान शिक्षणधारी असल्यास अशा १८ ते ४० वयोमर्यादेच्या लाभधारक विद्यार्थ्यांस महामंडळ हे प्रशिक्षण योजनेचा लाभ उपलब्ध करून देत आहे.

या योजनेअंतर्गत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या प्रशिक्षण योजनेतील व्यावसायिक अथवा तंत्रविषयक प्रशिक्षणप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून विविध उद्योग व्यवसाय उभारणीस

आवश्यक असणारे तंत्रविषयक व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण महामंडळामार्फत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. शिवाय लाभधारक विद्यार्थ्याला प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतनही देण्यात येते.

महामंडळामार्फत लाभधारक विद्यार्थ्यांना ३ ते ६ महिन्याचे तंत्रविषयक व्यावसायिक प्रशिक्षण मोफत व विद्यावेतन उपलब्ध करून दिले जाते. जेणेकरून लाभधारक विद्यार्थ्यांना स्वावलंबी जीवनाचा धडाच ह्या प्रशिक्षण योजनेद्वारे महामंडळ उपलब्ध करून देत आहे.

उपरोक्त उल्लेखिलेल्या योजना ह्या राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या अत्यंत कल्याणकारी अशा योजना आहेत. महिला, शिक्षणधारक विद्यार्थी आणि अपंग लाभधारक यांच्याकरीता ह्या योजना म्हणजेच उन्नतीची एक सुवर्णसंधी होय. परंतु ह्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी ही जिल्हयातील विकासात्मक महामंडळामार्फत होवू शकली नाही. कारण या योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेला निधी हा शासनाकडून वेळोवेळी उपलब्ध होवू शकला नाही. त्यामुळे लाभधारकांना या योजनेच्या लाभावाचून वंचित व्हावे लागत आहे.[३६]

## ३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ

### विशेष केंद्रीय अर्थसहाय्यांतर्गत योजना

जिल्हयातील मातंग व तत्सम दहा पोटजातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) याकरिता केंद्रशासनाच्या विशेष अर्थसहाय्यांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनामधील पहिली योजना म्हणजेच अनुदान योजना ही होय.

### १. अनुदान योजना

जिल्हयातील मातंग व तत्सम दहा पोटजातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी, जिल्हयातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने अनुदान योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील महामंडळाच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत छोट्या मोठ्या स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अनुदान योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

मातंग व तत्सम दहा पोट जातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारच्या अथवा अशा कोणत्याही प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ४०,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ५० टक्के अथवा जास्तीत जास्त रू. १०,००० पर्यंतचे अनुदान महामंडळामार्फत देण्यात येते.

**बँक कर्ज**

अनुदान वगळता उर्वरित ५० टक्के रक्कमेचे कर्ज जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकेमार्फत देण्यात येते.

बँकेमार्फत देण्यात येण-या कर्जावर बॅक आपल्या नियमाप्रमाणे व्याजदराची आकारणी करते.

बँक कर्जाची परतफेड ही सर्वसाधारणपणे ३६ ते ६० मासिक समान हप्त्यात करावी लागते.

शासनाच्या प्रत्येक वर्षाच्या भांडवली अर्थसंकल्पात या महामंडळास योजना राबविण्याकरीता विशेष केंद्रीय अर्थसहाय्यांतर्गत आर्थिक निधीची तरतूद करून महामंडळास निधी उपलब्ध करून दिला जातो. त्या निधीचे महामंडळाने केलेले वाटप, लाभार्थी संख्या याची माहिती तक्ता क्रमांक ४.१८ च्या आधारे घेऊया.[३७]

**तक्ता क्रमांक ४.१८**

**लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई जिल्हा कार्यालय, कोल्हापूर महामंडळातून खर्च केलेली रक्कम व लाभार्थींची वर्षनिहाय माहिती (१९८५-८६ ते मार्च २००६)**

| अ. नं. | वर्ष | लाभधारक संख्या | खर्च केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १९८५-८६ | -- | -- |
| २ | १९८६-८७ | १५१ | १५२८५० |
| ३ | १८८७-८८ | ४०८ | ५३०१४२ |
| ४ | १९८८-८९ | २२५ | ५८२७४६ |
| ५ | १९८९-९० | २१८ | ७१२५१६ |
| ६ | १९९०-९१ | २२५ | ५३५२१० |
| ७ | १९९१-९२ | २४५ | ९३२९१५ |
| ८ | १९९२-९३ | २६१ | ९७७५९० |
| ९ | १९९३-९४ | ४०२ | ११५७५०० |
| १० | १९९४-९५ | ३०२ | ९७५१५० |
| ११ | १९९५-९६ | १६२ | ७४६२०० |
| १२ | १९९६-९७ | १३७ | ६३९७५० |
| १३ | १९९७-९८ | ११६ | ५८९२५० |
| १४ | १९९८-९९ | २२८ | ११२७९०० |
| १५ | १९९९-२००० | २६० | १४५९९३६ |
| १६ | २०००-०१ | ३५० | २६५६४१७ |
| १७ | २००१-०२ | ४४५ | ३८२१४०० |
| १८ | २००२-०३ | ३२७ | ३२७६६६७ |
| १९ | २००३-०४ | ४६८ | ४५१४००० |
| २० | २००४-०५ | ८७ | ९१४५०० |
| २१ | २००५-०६ | ३२० | ९२३४५०० |
|  | एकूण | ५३३७ | ३५५३७१३९ |

संदर्भ : लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने दिलेल्या माहितीच्या आधारे दि. १९/१/२००६

उपरोक्त तक्त्यातून असे स्पष्ट होते की, या योजनेअंतर्गत महामंडळाने सुरुवातीपासून म्हणजेच १९८५-८६ ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत जिल्हयातील ५३३७ लाभधारकांना विविध उद्योग व्यवसाय उभारणीसाठी रू. ३,५५,३७,१३९ इतक्या रक्कमेचे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे.

तुलनात्मकदृष्ट्या पाहता असे लक्षात येते की, काही वर्षे संख्येने कमी असलेल्या लाभधारकांवर विकासात्मक महामंडळाने अधिक रक्कम खर्च केली आहे. यामध्ये लाभधारकांच्या व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक असलेल्या प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या अनुषंगाने अनुदानाचे वाटप केले आहे. यामध्ये काही लाभधारकांना रू. १०,००० तर काहींना रू. ४,००० ते ५,००० चे अनुदान हे विकासात्मक महामंडळाने उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे ही तफावत जाणवते.

जिल्हयातील दरवर्षी जवळजवळ ४०० ते ६०० मातंग व तत्सम पोटजातीतील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देवून त्यांच्या स्वयंरोजगारास हातभार लावून आर्थिकदृष्ट्या सबळ, सक्षम जीवनाचा लाभ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हे महामंडळामार्फत पार पाडले जात आहे.[३८]

महामंडळाने जिल्हयातील अनेक लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला आहे. ते पुढील तक्ता क्रमांक ४.१९ प्रमाणे वर्णन करता येईल.

**तक्ता क्रमांक ४.१९**

**महामंडळाच्या योजनांचा लाभ घेणा-या लाभार्थींची माहिती**

| अ. नं. | लाभधारकाचे नांव व पत्ता | व्यवसाय | बँकेने मंजूर केलेले कर्ज | महामंडळाने मंजूर केलेले कर्ज/ अनुदान | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| १ | बाळु रामा साठे<br>रा. रूई, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | स्टेशनरी | रू. १०,००० | रू. १०,००० | रू. २०,००० |
| २ | नोव्हा राजाराम घोसरवाडे<br>रा. इचलकरंजी, जि. कोल्हापूर | किरागा दुकान | रू. १४,००० | रू. १०,००० | रू. २४,००० |
| ३ | राजू दाजी कांबळे<br>रा. कबनूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | स्टेरिओ बॉक्स | रू. २०,००० | रू. १०,००० | रू. ३०,००० |
| ४ | फकिरा शिवा साठे<br>रा. रूई, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | म्हैस पालन | रू. १०,००० | रू. १०,००० | रू. २०,००० |
| ५ | दयानंद श्रावण आवळे<br>रा. इचलकरंजी, जि. कोल्हापूर | पानपट्टी | रू. १०,००० | रू. १०,००० | रू. २०,००० |
| ६ | उषाताई जीवन घाटगे<br>रा. रूकडी, ता. हातकंणगले, जि. कोल्हापूर | भांडी विक्री | रू. १०,००० | रू. १०,००० | रू. २०,००० |

| अ. नं. | लाभधारकाचे नांव व पत्ता | व्यवसाय | बँकेने मंजूर केलेले कर्ज | महामंडळाने मंजूर केलेले कर्ज/ अनुदान | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| ७ | भूपेंद्र रघुनाथ मोरे<br>रा. रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | मिरची व्यवसाय | रू. १०,००० | रू. १०,००० | रू. २०,००० |
| ८ | चंपाबाई विष्णू भोसले<br>रा. बेघर वसाहत, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | म्हैस पालन | रू. १४,००० | रू. १०,००० | रू. २४,००० |
| ९ | जयवंत यशवंत पाटोळे<br>रा. कसबा सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर | म्हैस पालन | रू. ५,००० | रू. ५,००० | रू. १०,००० |
| १० | मोहन कृष्णा लोखंडे<br>रा. रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | मिरची व्यवसाय | रू. १६,००० | रू. ४,००० | रू. २०,००० |
| ११ | शहाजी दादू धोंगडे<br>रा. हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | चांदी व्यवसाय | रू. ४०,००० | रू. १०,००० | रू. ५०,००० |
| १२ | राम रत्नाप्पा कवाळे<br>रा. कोल्हापूर | कटलरी | रू. १५,००० | रू. १०,००० | रू. २५,००० |
| १३ | कल्पना निवृत्ती विरगणे<br>रा. कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | कापड विक्री | रू. १०,००० | रू. १०,००० | रू. २०,००० |
| १४ | आप्पा तुकाराम लोंढे<br>रा. कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | कापड विक्री | रू. १०,००० | रू. १०,००० | रू. २०,००० |
| १५ | मारूती आप्पा मांग<br>रा. चिमणे, ता. आजरा, जि. कोल्हापूर | गाडी बैल | रू. १४,००० | रू. १०,००० | रू. २४,००० |

संदर्भ : लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, कोल्हापूर यांनी दिलेली यादी पान नं. २

वरील तक्त्यातील लाभधारकांप्रमाणेच अन्य लाभधारकांनाही महामंडळाने या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिलेला आहे. एकंदरीतच विकासात्मक महामंडळ हे अधिकाधिक लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून देत आहे आगि आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर, सबळ, सक्षम जीवन प्राप्त करून देण्यासाठीच सतत प्रयत्नरत राहत आहे.[३९]

२. **प्रशिक्षण योजना**

वरील इतर महामंडळाच्या प्रशिक्षण योजनेप्रमाणेच ह्याही महामंडळाच्या प्रशिक्षण योजनेअंतर्गत किमान शिक्षणधारी लाभधारक विद्यार्थ्यांना उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी अत्यावश्यक असलेले तंत्रविषयक कौशल्याचे अथवा व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षणाचे ज्ञान हे महामंडळ उपलब्ध करून देत आहे. यामध्ये १६ ते ४० वर्षे वयोगटातील लाभधारक प्रशिक्षणार्थीस महामंडळामार्फत ६ ते १२ महिन्याच्या कालावधीचे प्रशिक्षण हे विविध व्यावसायिक ट्रेडच्या शासनमान्य संस्थामार्फत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे.

विकासात्मक महामंडळ मात्र लाभधारक प्रशिक्षणार्थीची प्रशिक्षण फी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सादर करते.

१. वाहनचालक : प्रति प्रशिक्षणार्थीस संपूर्ण प्रशिक्षणाकरिता रू. २३०० (चारचाकी) व तीनचाकी वाहनाकरिता रू. २००० एवढे प्रशिक्षण शुल्क महामंडळ भरते.

२. ब्युटी पार्लर : प्रति प्रशिक्षणार्थीस संपूर्ण प्रशिक्षणाकरिता रू. ३५०० एवढे प्रशिक्षण शुल्क महामंडळ भरते.

३. शिवण कला : प्रति प्रशिक्षणार्थीस संपूर्ण प्रशिक्षणाकरिता रू. १२०० एवढे प्रशिक्षण शुल्क महामंडळ भरते.

४. संगणक : प्रति प्रशिक्षणार्थीस संपूर्ण प्रशिक्षणाकरिता रू. ३५०० एवढे प्रशिक्षण शुल्क महामंडळ भरते.

५. तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणाच्या एकूण कालावधीची प्रति प्रशिक्षणार्थीची फी रू. २५०० महामंडळ भरते.

विकासात्मक महामंडळ वरील इतर महामंडळाप्रमाणेच मोफत प्रशिक्षणाबरोबरच प्रशिक्षण भत्ता (विद्यावेतन) ही पुढीलप्रमाणे उपलब्ध करून देते.

१. प्रशिक्षणार्थी राहत असलेल्या ठिकाणीच प्रशिक्षण घेत असेल तर प्रति प्रशिक्षणार्थीस दरमहा रू. १५०/- इतके विद्यावेतन देण्यात येते.

२. महानगरपालिका क्षेत्रात राहणा-या व प्रशिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थीस दरमहा रू. २५०/- इतके विद्यावेतन देण्यात येते.

३. प्रशिक्षणार्थी राहत असणा-या खेड्यात अथवा शहराव्यतिरिक्त अन्य खेड्यात अथवा शहरात प्रशिक्षण घेत असल्यास प्रतिमहा रू. ३००/- इतके विद्यावेतन देण्यात येते.

शिवाय प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभधारकाला महामंडळाच्या इतर योजनांचा लाभ घ्यावयाचा असल्यास अथवा या प्रशिक्षणाद्वारे लाभधारक स्वयंरोजगार उभा करू इच्छित असल्यास, महामंडळ विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत अनुदान व अत्यल्प व्याजदराने अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे. यामध्ये महामंडळाने आतापर्यंत किती लाभधारक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आहे याची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.२० मध्ये पाहुया.[४०]

**तक्ता क्रमांक ४.२०**

**लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय कोल्हापूर प्रशिक्षण योजनेअंतर्गत वर्षनिहार्य प्रशिक्षणार्थींची माहिती (१९९२-९३ ते २००५-०६)**

| अ. नं. | वर्ष | लाभधारक संख्या | खर्च केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १९९१-९२ | ५० | ६०१११ |
| २ | १९९२-९३ | ४५ | १२१५४८ |
| ३ | १९९३-९४ | ५२ | ७९३६९ |
| ४ | १९९४-९५ | १०० | १७२१३९ |
| ५ | १९९५-९६ | ४८ | ४०३०१ |
| ६ | १९९६-९७ | ८५ | १४५८५६ |
| ७ | १९९७-९८ | ६२ | १४१४३२ |
| ८ | १९९८-९९ | ७५ | १०२७०४ |
| ९ | १९९९-२००० | ७५ | १४२९९० |
| १० | २०००-०१ | ४५ | १२८५६२ |
| ११ | २००१-०२ | -- | -- |
| १२ | २००२-०३ | १० | १८३२३ |
| १३ | २००३-०४ | ८६ | १४८००० |
| १४ | २००४-०५ | १० | ८१८० |
| १५ | २००५-०६ | ८७ | ८७१५० |
| | एकूण | ८३० | १३९६६६५ |

संदर्भ : लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने दिलेल्या माहितीच्या आधारे दि.१९/७/०६

वरील तक्त्यातून असे लक्षात आले की, विकासात्मक महामंडळाला शासनामार्फत उपलब्ध होत असलेल्या रक्कमेपैकी निव्वळ ५ टक्के रक्कम ही प्रशिक्षण योजनेवर खर्च करता येते. परंतु सुरुवातीपासून १९९०-९१ पर्यंतच्या काळात विकासात्मक महामंडळाला ही ५ टक्के रक्कम उपलब्ध होवू शकली नाही म्हणून महामंडळाला सुरुवातीच्या काळात ही योजना राबविता आली नाही.

या योजनेअंतर्गत महामंडळाच्या सुरुवातीच्या ५ ते ६ वर्षाचा अपवाद वगळता महामंडळाने ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत ८३० लाभधारक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आहे. त्यासाठी महामंडळाने शासनामार्फत उपलब्ध निधीअंतर्गत रू. १३,९६,६६५ इतकी रक्कम खर्च केली आहे.

महामंडळ या योजनेअंतर्गत वर्षाकाळी जवळजवळ ९० ते ११० लाभधारक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यास प्रयत्नरत आहे.[४१]

## राज्यशासन पुरस्कृत योजना

मातंग व तत्सम दहा पोटजातीतील लाभधारकांकरिता महाराष्ट्र शासनाच्या विशेष अर्थसहाय्यांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनेमधीलच ही एक योजना म्हणजेच सहकारी संस्थांचे भाग खरेदी योजना होय.

## १. सहकारी संस्थांचे भाग खरेदी योजना

या योजनेअंतर्गत जिल्हयातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना नोंदणीकृत सहकारी संस्थांचे भाग (शेअर्स) खरेदीकरिता अनुदानरूपाने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळात स्पष्ट केल्याप्रमाणे ह्याही योजनेअंतर्गत जिल्हयातील विविध सहकारी संघ, संस्था व कारखान्याचे भाग (शेअर्स) खरेदीकरिता महामंडळ अर्थसहाय्य करून मदतीचा हातभार लावीत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारच्या सहकारी संस्था, संघ व कारखान्याचे भाग (शेअर्स) खरेदीकरिता लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही मुख्यत: रू. २००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे लाभ मिळतो.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

सहकारी साखर कारखान्याच्या रू. ३००० किंमतीच्या, सहकारी सूत गिरणीच्या रू. २००० किंमतीच्या भाग (शेअर्स) खरेदीकरिता अनुक्रमे रू. २७०० व रू. १८०० पर्यंतचे अनुदान हे महामंडळामार्फत उपलब्ध करून दिले जाते.

**लाभधारकांचा सहभाग**

सहकारी साखर कारखान्याच्या, सहकारी सूत गिरणीच्या एका भाग खरेदीकरिता महामंडळामार्फत देण्यात येणारे अनुदान वगळता उर्वरित रक्कम अनुक्रमे रू. ३०० व रू. २०० पर्यंतची रक्कम ही लाभधारकाला स्वत:ला समाविष्ट करावी लागते.

शिवाय गृहनिर्माण, पतपुरवठा व उपभोग्य वस्तू विक्री सहकारी संस्था या व्यतिरिक्त इतर उत्पादन सहकारी संस्थांचे रू. २०० कमाल मर्यादेपर्यंतच्या किंमतीच्या एका भाग खरेदीकरिता महामंडळामार्फत ४ टक्के व्याजदराने थेट कर्ज पुरवठा केला जातो. जेणेकरून लाभधारक व्यक्तीला छोट्या मोठ्या सहकारी संस्थांचे एक घटक बनता येईल.[४२]

## २. बीज भांडवल योजना

महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलातून भांडवली अंशदानाच्या स्वरूपात शासनाकडून प्राप्त होणा-या निधीचा वापर बीज भांडवल योजना राबविण्यासाठी करण्यात येतो.

या योजनेअंतर्गत जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ व स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने लाभधारकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणे ह्याही योजनेअंतर्गत छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ बीज भांडवल योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ४०,००१ ते २,००,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील रक्कमेच्या, मंजूर कर्ज प्रकरणातील २० टक्के रक्कमेचा सहभाग रू. १०,००० पर्यंतच्या अनुदानासह महामंडळामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

**बँक कर्ज**

अनुदानासह २० टक्के रक्कमेचा सहभाग वगळता, उर्वरित कर्जराशीमध्ये ७५ टक्के रक्कमेचे कर्ज हे बँकेमार्फत उपलब्ध करून दिले जाते.

**लाभधारकांचा सहभाग**

बँक कर्ज व महामंडळाचा अनुदानासह २० टक्के रक्कमेचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकाला स्वत:ला करावा लागतो.

बँकेमार्फत देण्यात येणा-या कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदराची आकारणी केली जाते.

बँकेच्या कर्जाची परतफेड ही बँकेच्या नियमाप्रमाणे ठरवून दिलेल्या कालावधीमध्येच करावी लागते. यामध्ये महामंडळाने आतापर्यंत आर्थिक लाभ मिळवून दिलेल्या लाभधारकांची आकडेवारी ही तक्ता क्रमांक ४.२१ मध्ये दर्शविली आहे.[४३]

## तक्ता क्रमांक ४.२१

**लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय कोल्हापूर १९८५-८६ पासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत वाटप केलेल्या लाभधारकांची वर्षनिहार्य माहिती**

| अ. नं. | वर्ष | लाभधारकांची संख्या | वाटप केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १९८५-८६ | -- | -- |
| २ | १९८६-८७ | ०५ | ३३६५० |
| ३ | १८८७-८८ | १८ | ५०८१२ |
| ४ | १९८८-८९ | ०६ | १४५०० |
| ५ | १९८९-९० | ११ | ४८७३२ |
| ६ | १९९०-९१ | १० | ५२७५० |
| ७ | १९९१-९२ | १३ | १२२७१३ |
| ८ | १९९२-९३ | ०६ | ४६७५० |
| ९ | १९९३-९४ | १३ | १२६५७९ |
| १० | १९९४-९५ | ०७ | ६५६४९ |
| ११ | १९९५-९६ | ०९ | ८१९०१ |
| १२ | १९९६-९७ | ०३ | ३२५०० |
| १३ | १९९७-९८ | १२ | १२२९६ |
| १४ | १९९८-९९ | १४ | ११५१९८ |
| १५ | १९९९-२००० | १९ | १६७५३३ |
| १६ | २०००-०१ | १० | १३८३७४ |
| १७ | २००१-०२ | ११ | १२७६५९ |
| १८ | २००२-०३ | ०४ | ४६५४९ |
| १९ | २००३-०४ | ०९ | ८८००० |
| २० | २००४-०५ | ०४ | ५७८८७ |
| २१ | २००५-०६ | १२ | १४५५१६ |
| | एकूण | १९६ | १५७५५४५ |

संदर्भ : लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने दिलेल्या माहितीच्या आधारे दि.२६/७/०६

वरील तक्त्यावरून असे लक्षात आले की, लाभधारकांच्या व्यवसायाच्या अनुषंगाने अनुदान रू. १०,००० चे आणि त्यापेक्षा अधिक रक्कमेच्या अनुदानासह २० टक्केचे कर्ज हे विकासात्मक महामंडळ उपलब्ध करून देत असल्याने विकासात्मक महामंडळाच्या वर्षनिहाय लाभधारकांची संख्या आणि त्यांना वाटप करण्यात आलेली रक्कम याबाबत तफावत जाणवली.[४४]

या योजनेअंतर्गत महामंडळाने सुरुवातीपासून (१९८५-८६) ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत महामंडळाच्या अनुदानासह २० टक्के रक्कमेचे अर्थसहाय्य या अंतर्गत रू. १५,७५,५४५ इतकी रक्कम खर्च करण्यात आली. आणि १९६ लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला. यामध्ये महामंडळामार्फत प्रत्येक लाभधारकांला किमान रू. ८,००० व त्यापेक्षा अधिक रक्कमेचा लाभ २० टक्के रक्कमेचे बीज भांडवल या योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिला जात आहे. या योजनेअंतर्गत जिल्हयातून जवळजवळ २० ते २५ लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यास प्रयत्नरत आहे.

**३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना**

मातंग व तत्सम दहा पोटजातीतील लाभधारक विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी आवड असल्यास शिक्षण घेण्याची प्रचंड धडपड व जिद्द त्या विद्यार्थ्यांमध्ये असल्यास अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासास प्रोत्साहन देण्याचे काम हे विकासात्मक महामंडळ आपल्या शिष्यवृत्ती योजनेद्वारे करीत आहे.

जिल्हयातील विकासात्मक महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी प्रसिध्द केलेल्या शिष्यवृत्ती योजनेच्या जाहिरातीच्या अनुषंगाने लाभधारक विद्यार्थी या योजनेच्या लाभासाठी प्रयत्नरत राहतो.

विकासात्मक महामंडळाला तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या २० लाख रुपयाच्या निधीची गुंतवणूक विकासात्मक महामंडळाने फिक्स डिपॉझिटमध्ये केली. त्यातून येणा-या प्रत्येक वर्षाच्या व्याजाच्या रक्कमेतूनच विकासात्मक महामंडळ हे लाभधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करते आहे.

यामध्ये लाभधारक विद्यार्थी इयत्ता १० वी, १२ वी, पदवी आणि पदविका, अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि कायदेविषयक परीक्षेत कमीत कमी ६० टक्के अथवा त्याहून अधिक गुण मिळविला असल्यास जिल्हानिहाय गुणवत्तेनुसार निवड ही विकासात्मक महामंडळ मर्यादित मुंबई हे आपल्या मुख्य कार्यालयामार्फत करते आणि प्रति विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्ती रक्कमेचा धनादेश पुणे या प्रादेशिक विभागामार्फत जिल्हयातील विकासात्मक महामंडळाला बहाल करते. यामध्ये

१. इयत्ता १० वी रू. १०००/- प्रति वार्षिक

२. इयत्ता १२ वी रू. १५००/- प्रति वार्षिक

३. पदवी व पदविका रू. २०००/- प्रति वार्षिक

४. अभियांत्रिकी व वैद्यकीय रू. २५००/- प्रति वार्षिक

विकासात्मक महामंडळामार्फत जिल्हयातील विविध क्षेत्रातील गुणवंत आणि विशेष प्राविण्याधारक अशा पाच लाभधारक विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला जात आहे. त्यासाठी विकासात्मक महामंडळ हे रू. ८००० ते १०००० पर्यंतची रक्कम ही प्रत्येक वर्षी खर्च करीत आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणांची कदर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विकासात्मक महामंडळ करीत आहे.[४५]

**राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना (एन. एस. एफ. डी. सी.)**

**१. मुदती कर्ज योजना**

या योजनेअंतर्गत जिल्हयातील अनुसूचित जाती (मातंग व तत्सम दहा पोटजाती) तील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी विकासात्मक महामंडळ हे मुदती कर्ज (टर्म लोन) योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारच्या अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या लहान मोठ्या स्वरूपाचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ३०,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

प्रकल्प गुंतवणूक मर्यादा, एन. एस. एफ. डी. सी. ची कर्ज रक्कम व अनुदानासह महामंडळाचा सहभाग या बाबी महामंडळाने निश्चित केलेल्या आहेत. त्यांचा विचार तक्ता क्रमांक ४.२२ च्या आधारे करूया.

**तक्ता क्रमांक ४.२२**

**प्रकल्प गुंतवणूक मर्यादा, एन. एस. एफ. डी. सी. ची कर्ज रक्कम व अनुदानासह महामंडळाचा सहभाग**

| अ. नं. | कर्ज रक्कम | एन. एस. एफ. डी. सी. कर्ज रक्कम (एकूण कर्ज रक्कम) | महामंडळाचा सहभाग रू. १०,००० अनुदानासह एकूण कर्ज रक्कमेच्या | अर्जदाराचा सहभाग | एन. एस. एफ. डी. सी. चा व्याजदर द. सा. द. शे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | रू.१० लाखापर्यंतची गुंतवणुक असल्यास | ९० टक्के | १० टक्के | ७ टक्के | ४ टक्के |
| २ | रू. १ लाख ते २.५ लाखापर्यंत गुंतवणूक असल्यास | ९० टक्के | ८ टक्के | ७ टक्के | ४ टक्के |
| ३ | रू. २.५ लाख ते ५ लाखापर्यंत गुंतवणूक असल्यास | ९० टक्के | ७ टक्के | ७ टक्के | ४ टक्के |
| ४ | रू. ५ लाख व त्यापेक्षा अधिक गुंतवणूक असल्यास | ९० टक्के | ५ टक्के | ९ टक्के | ४ टक्के |

संदर्भ:लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित कोल्हापूर माहितीपुस्तिका पान नं. २

वरील तक्त्यावरून प्रकल्प गुंतवणूक मर्यादेसह व्याजदराबाबतची माहिती मिळते. राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या (अनुदान वगळून) कर्जाची परतफेड ही सर्वसाधारणपणे पाच वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते. तसेच महामंडळाने राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाच्या योजनेचा लाभ जिल्हयातील किती लाभधारकांना उपलब्ध करून दिला आहे याची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.२३ मध्ये पाहुया.[४६]

### तक्ता क्रमांक ४.२३

### लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई जिल्हा कार्यालय कोल्हापूरने १९९५-९६ पासून ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत वाटप केलेल्या लाभार्थींची वर्षनिहाय माहिती

| अ. नं. | वर्ष | एन. एस्. एफ. डी. सी. मुदती कर्ज लाभधारकांची संख्या | एन. एस. एफ. डी. सी. मार्फत कर्ज रक्कम वाटप/खर्च | विकासात्मक महामंडळाचा सहभाग रू. १०,००० अनुदानासह वाटप/खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | १९९४-९५ | -- | -- | -- |
| २ | १९९५-९६ | ०१ | १४३१८० | ८७४० |
| ३ | १९९६-९७ | १६ | ६०३२००० | ७७८५० |
| ४ | १९९७-९८ | ०८ | ३५३००० | ७४००० |
| ५ | १९९८-९९ | -- | -- | -- |
| ६ | १९९९-२००० | ०१ | १७८१५० | ७८५० |
| ७ | २०००-०१ | ०२ | ६०३७९२ | १५७०० |
| ८ | २००१-०२ | १५ | २२२५००० | ६८०००० |
| ९ | २००२-०३ | १० | ९८०००० | २३०००० |
| १० | २००३-०४ | ०२ | ३००००० | ३७००० |
| ११ | २००४-०५ | २५ | ३५००००० | १००००० |
| | एकूण | ८० | १४३१५३२२ | १२३११४० |

संदर्भ : लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने दिलेली माहिती दि. २६/७/२००६

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, विकासात्मक महामंडळाच्या सुरूवातीला सन १९९४-९५ आणि १९९८-९९ या दोन्ही वर्षी राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाच्या कर्ज रक्कमेचा धनादेश जिल्हयातील विकासात्मक महामडळाला उपलब्ध झाला नाही. म्हणूनच विकासात्मक महामंडळाने या दोन्ही वर्षी जिल्हयातील लाभधारकांना या योजनाचा लाभ उपलब्ध करून दिला नाही. या योजनेअंतर्गत जिल्हयातील विकासात्मक महामंडळाने सुरुवातीपासून ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत जिल्हयातील ८० लाभधारकांना विविध प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी, वाहन खरेदीकरिता म्हणून रू. १,५५,४६,४६२ इतकी रक्कम खर्च केली आहे.[४७]

## २. लघु ऋण योजना

या योजनेअंतर्गत जिल्हयातील अनुसूचित जाती (मातंग व तत्सम दहा पोटजाती) लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी जिल्हयातील विकासात्मक महामंडळ हे लाभधारकांना लघु ऋण योजनेद्वारे अर्थसहाय्य करून देत आहे.

या योजनेअंतर्गत वरील योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत उद्योग अथवा व्यवसाय उभारणीकरिता महामंडळ अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे छोटे अथवा मोठे स्वरूपाचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २५,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या रक्कमेतील रू. १०,००० पर्यंतचे अनुदान हे महामंडळामार्फत उपलब्ध करून दिले जाते.

**बँक कर्ज**

अनुदान वगळता प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील उर्वरित रक्कम ही स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकामार्फत उपलब्ध करून दिली जाते.

बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या कर्जावर बँक आपल्या नियमाप्रमाणे व्याजदराची आकारणी करते आणि बँकानी ठरवून दिलेल्या कालावधीमध्येच कर्जाच्या रक्कमेची परतफेडही करावी लागते.

जिल्हयातील विकासात्मक महामंडळाने अलीकडेच म्हणजे २००० पासून या लघु ऋण योजनेची सुरुवात केली असून याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठीही महामंडळ प्रयत्नरत आहे. यामध्ये महामंडळाने आतापर्यंत केलेल्या खर्चाची व लाभ मिळविलेल्या लाभधारकांची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.२४ मध्ये दर्शविली आहे.[४८]

**तक्ता क्रमांक ४.२४**

**लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय कोल्हापूर २०००-०१ पासून ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत वाटप केलेल्या लाभधारकांची वर्षनिहाय माहिती**

| अ. नं. | वर्ष | एन. एस. एफ. डी. सी. लघु ऋण योजना लाभधारक संख्या | विकासात्मक महामंडळाने केलेले वाटप/खर्च |
|---|---|---|---|
| १ | २०००-०१ | -- | -- |
| २ | २००१-०२ | ११ | ५६००० |
| ३ | २००२-०३ | ०३ | १५००० |
| ४ | २००३-०४ | ०८ | ५८००० |
| ५ | २००४-०५ | -- | -- |
| | एकूण | २२ | १२९००० |

संदर्भ : लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ कोल्हापूर यांनी दिलेली माहिती पान नं. २

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, या योजनेअंतर्गत विकासात्मक महामंडळाने सन २०००-०१ पासून ते ३१ मार्च २००५ अखेरपर्यंत जिल्हयातील २२ लाभधारकांना व्यवसाय उभारणीसाठी अनुदान स्वरूपात रू. १,२९,००० पर्यंतच्या रक्कमेचे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे.

सन २०००-०१ आणि २००४-०५ मध्ये राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ या राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाकडून जिल्हयातील लाभधारकांच्या अर्जांची मंजुरी, त्यासाठी आवश्यक धनादेश हा जिल्हयातील विकासात्मक महामंडळाला उपलब्ध झाला नाही म्हणूनच या दोन्ही वर्षी लाभधारकांना विकासात्मक महामंडळाकडून लाभ उपलब्ध करून दिला गेला नाही.

विकासात्मक महामंडळ हे वर्षाकाठी जवळजवळ १५ ते २० लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी सतत प्रयत्नरत आहे.[४९]

## ३. महिला समृध्दी योजना

जिल्हयातील मातंग व तत्सम दहा पोटजातीतील महिलांना, विशेषत: विधवा, परितक्त्या व निराधार महिलांना या योजनेअंतर्गत स्वयंरोजगाराच्या उभारणीसाठी आवश्यक असलेले भांडवल (आर्थिक सहाय्य) हे जिल्हयातील विकासात्मक महामंडळ हे महिला समृध्दी योजनेअंतर्गत उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका आणि विकासात्मक महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने लाभधारक महिलांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला जातो.

या योजनेअंतर्गत महिलांना घरबसल्या कापड विक्री, बांगड्या विक्री, झाडू बांधणी, किराणा दुकान, टेलरिंग शॉप, भाजीपाला अथवा फळाचे दुकान इ. स्वरूपाचे कुटीर उद्योग अथवा लघुउद्योग उभारणीसाठी विकासात्मक महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

लाभधारक महिलांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे लघुउद्योग उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २५,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

### अनुदान (महामंडळामार्फत)

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील रक्कमेच्या रू. १०,००० पर्यंतचे अनुदान महामंडळामार्फत उपलब्ध करून दिले जाते.

### बँक कर्ज

अनुदान वगळता प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील उर्वरित रक्कम ही जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकेमार्फत उपलब्ध करून दिली जाते.

बँकेमार्फत देण्यात येणा-या कर्जावर बँक आपल्या नियमाप्रमाणे व्याजदराची आकारणी करते आणि कर्जाची परतफेड ही बँकेने ठरवून दिलेल्या कालावधीमध्येच करावी लागते.

सदर योजना अलीकडेच २००५-०६ पासून राबवली जात आहे. या योजनेस एन. एस. एफ. डी. सी. मार्फत निधी प्राप्त होते आहे.[५०]

## ४. महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणा-या योजना

चर्मकार समाजातील दुर्बल, कमकुवत व दारिद्र्यरेषेअंतर्गत जीवन जगणा-या (ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागात रू. १५,९७६/- व शहरी भागात रू. २१,२०६/- पेक्षा जास्त नाही.) कुटुंबातील व्यक्तींना या योजनेअंतर्गत स्वयंरोजगार उभारणीसाठी आवश्यक असलेले अर्थसहाय्य (भांडवल) हे महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ ५० टक्के अनुदान योजनेअंतर्गत उपलब्ध करून देत आहे.

या योजनेअंतर्गत चर्मोद्योग अथवा वरील विकासात्मक महामंडळाच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

चर्मकार समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २०,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**अनुदान (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ५० टक्के रक्कम ही महामंडळामार्फत अनुदानरूपाने उपलब्ध करून दिली जाते.

**बँक कर्ज**

महामंडळामार्फत देण्यात येणा-या ५० टक्के रक्कमेचे अनुदान वगळता उर्वरित रक्कम ही बँकेमार्फत उपलब्ध करून दिली जाते.

बँकेमार्फत देण्यात येणा-या कर्जावर बँक आपल्या नियमाप्रमाणे द. सा. द. शे. १२.५० ते १६.५० टक्के पर्यंत व्याजदराची आकारणी करते. कर्जाची परतफेड ही

व्यवसाय सुरू झाल्यानंतर सहा महिन्यांनी ३६ ते ६० समान मासिक हप्त्यात करावी लागते.

२. **बीज भांडवल योजना**

या योजनेअंतर्गत लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांच्याकरिता एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी विकासात्मक महामंडळ, जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत चर्मोद्योग अथवा वरील इतर योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत विविध प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

लाभधारक व्यक्ती (कुटूंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. २४,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ३५,००० पर्यंतची असल्यास २५ टक्के रक्कमेचा सहभाग हा बीज भांडवल म्हणून महामंडळामार्फत उपलब्ध करून दिला जातो. त्यापैकी रू. १०,००० पर्यंतची रक्कम ही अनुदान म्हणून देण्यात येते.

प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ३५,००० च्यावर रू. २,००,००० पर्यंतची असल्यास त्यापैकी २० टक्के रक्कमेचा सहभाग हा बीज भांडवल म्हणून महामंडळामार्फत उपलब्ध करून दिला जातो. त्यापैकी रू. १०,००० पर्यंत ची रक्कम ही अनुदान म्हणून देण्यात येते.

महामंडळामार्फत देण्यात आलेल्या बीज भांडवल कर्जाच्या रक्कमेवर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

**बँक कर्ज**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील अनुदान व बीज भांडवल रक्कमेचा सहभाग वगळता उर्वरित ७५ टक्के रक्कम ही जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकेमार्फत उपलब्ध करून दिली जाते.

**लाभधारकाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील अनुदान/बीज भांडवल व बँक कर्ज वगळता उर्वरित केवळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकाला स्वतःला समाविष्ट करावा लागतो.

बँक आणि महामंडळाचे बीज भांडवल कर्ज, दोन्ही कर्जाच्या रक्कमांचे परतफेड ही सर्वसाधारणपणे ३६ ते ६० समान मासिक हप्त्यात करावी लागते.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ (एन. एस. एफ. डी. सी.), नवी दिल्ली यांच्या योजना**

शासन निर्णय क्र. चविम १०१७/प्र.३२६/विधयो-२, दि. १७/९/१९९७ अनुसार राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी "अधिकृत वाहिनी" म्हणून राज्यातील महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ हे कार्यरत आहे. याचीच "अधिकृत वाहिनी" म्हणून राज्यातील विभागीय स्तरावरील महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ हे कार्यरत आहेत. पण विभागीय महामंडळाची "अधिकृत वाहिनी" म्हणून जिल्हयात ह्या महामंडळाची स्वतंत्र कार्यालयेही कार्यरत नसल्याने पर्यायी व्यवस्था महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ ही प्रस्थापित यंत्रणाच या महामंडळाची "अधिकृत वाहिनी" म्हणून कार्यरत आहे.

चर्मकार समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) याकरिता केंद्र शासनाच्या विशेष अर्थसहाय्यांतर्गत राबविण्यात येणा-या योजनामधील एक योजना म्हणजेच मुदती कर्ज सहाय्यता योजना ही होय.

## १. मुदती कर्ज योजना

या योजनेअंतर्गत जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना स्वयंरोजगार उभारणीसाठी राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ व महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मुदती कर्ज योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत छोट्या मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थस्हाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील चर्मकार समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ३०,००,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

### राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा सहभाग

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा असतो.

### महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा सहभाग

राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील उर्वरित १० टक्के रक्कमेचा सहभाग हा विकासात्मक महामंडळाचा असतो.

### लाभधारकांचा सहभाग

लाभधारकाला स्वत:ला समाविष्ट करावा लागत असलेला सहभाग हा पुढील तक्ता क्रमांक ४.२५ च्या आधारे स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्रमांक ४.२५**

**प्रकल्प गुंतवणूक मर्यादा व लाभधारकाचा सहभाग**

| अ. नं. | प्रकल्प गुंतवणूक मर्यादा | लाभधारकाचा सहभाग |
|---|---|---|
| १ | रू. १ लाखापर्यंत | -- |
| २ | रू. १ लाख ते २.५ लाखापर्यंत | २ टक्के |
| ३ | रू. २.५ लाख ते ५ लाखापर्यंत | ३ टक्के |
| ४ | रू. ५ लाखापेक्षा अधिक | ५ टक्के |

संदर्भ : महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ माहितीपुस्तिका पान नं. २,३

राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेवरील व्याजदर हा द. सा. द. शे. ७ टक्के इतका रू. ५,००,००० पर्यंतची प्रकल्प गुंतवणूक असल्यास आकारला जातो. तर रू. ५,००,००० पेक्षा अधिक प्रकल्प गुंतवणूक मर्यादा असल्यास द. सा. द. शे. ९ टक्के व्याजदर आकारला जातो.

**कर्जाची परतफेड**

उद्योग अथवा व्यवसाय उभारणीनंतर सहा महिन्यांनी कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही तीन ते सहा महिन्याच्या (तिमाही/सहामाही) हप्त्यांमध्ये जास्तीत जास्त विलंबासह १० वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.

**२. बीज भांडवल योजना**

जिल्हयातील चर्मकार सनाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना स्वयंरोजगार उभारणीस राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ व महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बीज भांडवल सहाय्यता योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील प्रकारच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी विकासात्मक महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

चर्मकार समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५०,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ८० टक्के अथवा रू. १० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा सहभाग**

एन. एस. एफ. डी. सी. चा सहभाग वगळता उर्वरित २० टक्के रक्कमेचा (अनुदानासह) सहभाग हा विकासात्मक महामंडळाचा असतो.

राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. २ टक्के व्याजदर आकारला जातो. त्यापैकी १ टक्के रक्कम ही राज्य पातळीवरील महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ हे राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाला देईल.

**कर्जाची परतफेड**

बीज भांडवल कर्ज प्राप्त झाल्यापासून ते पाच वर्षाच्या कालावधीमध्ये परत करावी लागते. या कालावधीमध्ये परत न केल्यास हे कर्ज पाच वर्षानंतर मुदती कर्जामध्ये रूपांतरित केले जाते. रूपांतरित केल्यापासून पाच वर्षाच्या कालावधीमध्ये तिमाही/सहामाही हप्त्यामध्ये ते परत करावे लागते. बीज भांडवल कर्जाच्या रक्कमेवरील व्याजाचा दर समाप्त होवून तो मुदती कर्जाच्या व्याजदर अनुक्रमे ७ टक्के व ९ टक्के इतका लागू होतो.

व्यवसाय उभारणीनंतर दोन वर्षांनी रक्कमेची परतफेड सुरू होईल. जेणेकरून लाभधारकाला व्यवसाय स्थिरत्व लाभेल.

## ३. पूरक कर्ज - ब्रीज लोन योजना

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना स्वयंरोजगार उभारणीकरिता राष्ट्रीय स्तरावरील एन. एस. एफ. डी. सी. व महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील प्रकारच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत लहान अथवा मोठ्या स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

चर्मकार समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ३०,००,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा सहभाग**

राष्ट्रीय स्तरावरील एन. एस. एफ. डी. सी. चा सहभाग वगळता उर्वरित रक्कमेचा सहभाग हा महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा असतो.

एन. एस. एफ. डी. सी. महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेवरील व्याजदर हा मुदती कर्जाच्या व्याजदराप्रमाणे द. सा. द. शे. ७ टक्के रू. ५०,००० पर्यंतची प्रकल्प गुंतवणूक असल्यास, तर रू. ५०,००० पेक्षा अधिक गुंतवणूक असल्यास द. सा. द. शे. ९ टक्के इतका व्याजदर आकारला जातो.

महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेवरील व्याजदर हा द. सा. द. शे. ४ टक्के हा रू. ५ लाखापर्यंतची प्रकल्प गुंतवणूक असल्यास तर रू. ५ लाखापेक्षा अधिक प्रकल्प गुंतवणूक असल्यास द. सा. द. शे. ६ टक्के व्याजदर आकारला जातो.

**कर्जाची परतफेड**

महामंडळाकडून कर्जप्राप्तीनंतर सर्वसाधारणपणे दोन वर्षाच्या कालावधीमध्ये या कर्जाच्या रक्कमेची परतफेड करावी लागते.

**४. खेळते भांडवल कर्ज योजना**

चर्मकार समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ आणि महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने खेळते भांडवल कर्ज या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील प्रकारच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या व्यवसाय अथवा उद्योग उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

जिल्हयातील चर्मकार समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाटी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ३,००,००० पर्यंतची असल्यास व रू. ३,००,००० पेक्षा जास्त परंतु रू. ३,००,००० पर्यंतच्या खेळत्या भांडवलास मार्जिन उद्योगाच्या लागतीचा भाग मानल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ७० टक्के रक्कमेचे खेळते भांडवल अथवा रू. ७,००,००० यापैकी जे कमी असेल त्या रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा सहभाग**

एन. एस. एफ. डी. सी. चा सहभाग वगळता उर्वरित रक्कमेचा सहभाग हा विकासात्मक महामंडळाला करावा लागतो.

**व्याजाचा दर**

राज्यपातळीवरील विकासात्मक महामंडळ लाभधारकाकडून वार्षिक १० टक्के व्याजदराने व्याजाची आकारणी करेल व एन. एस. एफ. डी. सी. या राष्ट्रीय स्तरावरील महामंडळास वार्षिक ८ टक्के व्याजदराने पैसे परत करेल.

**कर्जाची परतफेड**

लाभधारकाला महामंडळाद्वारे खेळत्या भांडवली कर्जाची रक्कम दिल्यापासून तीन वर्षे पूर्ण होण्यापूर्वी कर्जाची रक्कम ही राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाकडे सुपूर्द करावी लागते.[५१]

**५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजना**

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) याकरिता राज्यशासनाच्या विशेष अर्थसहाय्यांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनामधीलच एक योजना म्हणजे बीज भांडवल योजना होय.

**१. बीज भांडवल योजना**

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना कृषी व संलग्न व्यवसाय, पारंपरिक व्यवसाय, तांत्रिक स्वरूपाचे व्यवसाय, वाहतूक क्षेत्राशी संबंधित व्यवसाय तर लघुउद्योग अशा विविधांगी स्वरूपाचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी, जिल्हयातील महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ व स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने बीज भांडवल योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे. या योजनेअंतर्गत येत असलेले व्यवसाय हे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. कृषी व संलग्न व्यवसाय**

फुलझाडांची लागवड, आळंबी उत्पादन, रेशीम उद्योग, दुग्ध व्यवसाय, फळबाग, मळणी यंत्र, ट्रॅक्टर ट्रॉली, कुक्कुटपालन, शेळी पालन, मत्स्य पालन व्यवसाय.

## २. पारंपरिक व्यवसाय

सुतारकाम, धोबी काम, कुंभार काम, लोहारकाम, लाकूड कोरीव काम, टेलरिंग मशीन शॉप, हस्तकला, हातमागाचे कापड तयार करणे, दागिने बनविणे, सुती कापड तयार करणे, ब्लँकेट तयार करणे, बांगडीचे दुकान, मासे खरेदी व विक्री, फळ भाजीपाला विक्री, केशकर्तनालय

## ३. तांत्रिक स्वरूपाचे व्यवसाय

टायर दुरुस्तीचे दुकान, वाहन दुरुस्तीचे दुकान, पी. यु. सी. सेंटर (फिरते प्रदूषण मापक केंद्र), वाहने सर्व्हिसिंग केंद्र, सायकल दुरुस्तीचे दुकान, मोटारसायकल दुरुस्ती दुकान, विद्युत मोटार वायडिंग व पंपसेट विक्री, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू दुरुस्ती सेंटर, विद्युत वर्कशॉप, टायपिंग केंद्र, वास्तुविशारद व्यवसाय, बॅटरी चार्जिंग व दुरुस्ती, फ्रीज, वातानुकूलित यंत्र दुरुस्ती, ग्लास व फोटो फ्रेम सेंटर, टी. व्ही. रेडिओ दुरुस्ती, डिश अँटेना, कुलूप रिपेअर करणे व बनविणे इ.

## ४. वाहतूक क्षेत्राशी संबंधित व्यवसाय

पाण्याचा वापर केलेली गाडी, बैलगाडी, चाकांना टायर वापरलेली बैलगाडी, सायकल रिक्षा, ऑटोरिक्षा, दळणवळण व्यापार संस्था, जीप/टुरिस्ट टॅक्सी, मारुती व्हॅन, मिनी बस, मिनी ट्रक इ.

## ५. इतर लघु व्यवसाय

सिमेंट जाळी उत्पादन, आईस फॅक्टरी, मिनी आईस कारखाना, घरगुती फरसाणा उद्योग, हॉटेल धाबा, केबल व्यवसाय, मसाला उद्योग (पॅकिंग), आइस्क्रीम ज्युस सेंट, पेप्सी कारखाना, खडू बनविणे, छोटा पेन कारखाना, पेट्या उत्पादन, केसाचे ब्रश उत्पादन, इमिटेशन ज्वेलरी शॉप, बादल्याचे उत्पादन, लोखंडी सामान, रंगकाम, छापखाना, स्क्रीन प्रिंटिंग, विटा बनविणे, टाचण्या पिना कारखाना, धूप चंदन, अगरबत्ती, मेणबत्ती बनविणे, पुस्तकांचे दुकान, चहा पत्ती केंद्र, झेरॉक्स मशीन, मॅचिंग सेंटर. कायदेशीर सल्लागार केंद्र, पान बिडी गाळा, बी-बियाणे व औषधे, खते विक्री, टेन्ट सप्लायर्स, मिठाईचे दुकान, स्टील भांडी दुकान, कापडाचा व्यापार, पेंटीग करण्याचे दुकान, जनरल स्टोअर्स, प्लॅस्टिक शॉपी, एस. टी. डी पी. सी. ओ. बूथ,

मिनी होम अल्पायन्सेस दुकान, व्हिडिओ लायब्ररी, ऑडीओ सीडी व्हीसीडी रेकॉर्डींग, बांबूपासून गृहोपयोगी वस्तू बनविणे, माशाची जाळी बनविणे, पुस्तक बांधणी (पेपर मार्ट), पिठाची गिरणी, मच्छीमार नौका केंद्र, पर्यटन व्यवसायाशी संबंधित उद्योग, लोखंडी सामान व रंगकाम, आयुर्वेदिक दवाखाना, औषधाचे दुकान, प्लायवूड सप्लाय दुकान, ऑटो स्पेअर पार्ट, स्टील फॅब्रीकेशन, वराहपालन, ब्युटी पार्लर, हिरा कापणे, त्याला आकार देणे.

या व्यवसायाव्यतिरिक्त नवीन व्यवसायांसाठी कर्ज पुरवठा हवा असल्यास त्याचा प्रकल्प अहवाल जिल्हा कार्यालयामार्फत सादर केल्यास त्याची छाननी करून, ती मान्य करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत केली जाते.

वरील प्रकारच्या छोट्या अथवा मोठ्या प्रकारच्या व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ बीज भांडवल योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे. शिवाय लाभधारकांना व्यवसायासंबंधीचे मार्गदर्शन करण्यासाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमही महामंडळामार्फत आयोजित केला जातो.

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५,००,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.[५२]

**कर्ज (महामंडळामार्फत)**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या २० टक्के रक्कमेचा सहभाग हा महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळामार्फत केला जातो.

**बॅंक कर्ज**

महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ७५ टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बॅंकामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

**लाभधारकांचा सहभाग**

महामंडळाचा व बँक कर्ज यांचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकाला स्वत:ला करावा लागतो.

विकासात्मक महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ६ टक्के व्याजदर आकारला जातो.

राष्ट्रीयकृत बँकामार्फत देण्यात येणा-या कर्जावर बँक आपल्या नियमाप्रमाणे व्याजदराची आकारणी करते. यामध्ये महामंडळाने जिल्हयातील लाभधारकांना व्यवसाय उभारणी, वृध्दी याकरीता आर्थिक मदत मिळवून दिली आहे. ती वर्षाकाठी किती लाभधारकांना मिळवून दिली आहे याची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.२६ च्या आधारे पाहुया.[५३]

**तक्ता क्रमांक ४.२६**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि., मुंबई जिल्हा कार्यालय कोल्हापूर २०००-०१ पासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत वर्षनिहाय माहिती**

| अ. नं. | वर्ष | राज्य महामंडळाच्या बीजभांडवल योजनेतील वर्षनिहाय वाटप | | |
|---|---|---|---|---|
| | | लाभधारक | रक्कम | संपूर्ण वसुली होऊन बंद झालेली खाती |
| १ | २०००-०१ | ०७ | २५०००० | ०१ |
| २ | २००१-०२ | १४ | २१६२०० | ०१ |
| ३ | २००२-०३ | १५ | १८८४९० | -- |
| ४ | २००३-०४ | २० | २२५८०३ | ०१ |
| ५ | २००४-०५ | १४ | १५३६०० | -- |
| ६ | २००५-०६ | ०७ | १९९८०० | -- |
| | एकूण | ७७ | १२३३८९३ | ०३ |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली वर्षनिहाय माहिती पान नं. १

वरील तक्त्यावरून असे लक्षात आले की, सन २०००-०१ आणि २००५-०६ यावर्षी लाभधारकांनी मोठ्या रक्कमांच्या म्हणजेच लाखाच्या स्वरूपात भांडवल उभारणी करून (प्लायवूड, हार्डवेअर दुकान इ.) व्यवसाय सुरू केला. त्यामुळे महामंडळाने ही

निव्वळ ७ लाभधारकांकरीता अधिक रक्कमांचे कर्ज वितरीत केले असल्याने संख्येने कमी असलेल्या लाभधारकांवर महामंडळाने अधिक रक्कम खर्च केली आहे.

या योजनेअंतर्गत विकासात्मक महामंडळाच्या सुरुवातीपासून (१९९९-२०००) ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत जिल्हयातील ७७ लाभधारकांना विविध प्रकारच्या उद्योग व्यवसाय उभारणीसाठी विकासात्मक महामंडळाने रू. १२,३३,८९३ इतक्या रक्कमेचे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे. यापैकी विकासात्मक महामंडळ हे वर्षाकाठी जवळजवळ १५ ते ३० लाभधारकांना या योजनेचा लाभ मिळवून देवून त्यांना कष्टार्जित मिळकतीचे मार्ग उपलब्ध करून देत आहे. यामध्ये समाविष्ट असलेले लाभधारक हे तक्ता क्रमांक ४.२७ मध्ये दर्शविलेले आहेत.[५४]

**तक्ता क्रमांक ४.२७**

**लाभधारकांची माहिती**

| अ. नं. | लाभधारकाचे नांव व पत्ता | व्यवसाय | महामंडळाचे २० टक्के बीज भांडवल | वितरीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बाळासो दादू गुरव<br>रा. चावरे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | म्हैस पालन | रू. ४०,००० | रू. २,००,००० |
| २ | श्री. महादेव बापू गवळी<br>रा. कोल्हापूर | किराणा दुकान | रू. ४५,००० | रू. २,२५,००० |
| ३ | श्रीमती अंजना बाळासो माळी<br>रा. बालिंगा, ता. करवीर, जि. कोल्हापूर | किराणा दुकान | रू. ४०,००० | रू. २,००,००० |
| ४ | श्री. विलास कृष्णा भांडागळे<br>रा. रूपनेवाडी, ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर | सोनार काम | रू. ८,००० | रू. ४०,००० |
| ५ | श्री. रविंद्र दामोदर सुतार<br>रा. तळाशी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | सुतार काम | रू. १५,००० | रू. ७५,००० |
| ६ | श्री. तानाजी सखाराम सुतार<br>रा. झुलपेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर | म्हैस पालन | रू. ६,००० | रू. ३०,००० |
| ७ | श्री. बाजीराव कृष्णा कुंभार<br>रा. सावे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर | म्हैस पालन | रू. ९,००० | रू. ३०,००० |
| ८ | श्री. संतोष लक्ष्मण संकपाळ<br>रा. वळसवडे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर | म्हैस पालन | रू. १२,००० | रू. ६०,००० |
| ९ | श्री. ज्ञानदेव गोपाळ राऊत<br>रा. चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | सलून शॉप | रू. १०,००० | रू. ५०,००० |
| १० | श्रीमती विद्या सुर्यकांत सुतार<br>रा. गंजीमाळ, कोल्हापूर | कापड दुकान | रू. १२,००० | रू. ६०,००० |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली लाभधारकांची यादी पान नं. १ ते ४

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारकांना परंपरागत व्यवसायात वृध्दी करण्यासाठी अथवा स्वयंरोजगार उभारणीसाठी, स्वयंरोजगारातून त्यांच्या जीवनाची वाटचाल समृध्दीच्या दिशेने करण्यासाठी हे विकासात्मक महामंडळ सतत प्रयत्नरत आहे.[५५]

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजना**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत सामाजिक न्याय मंत्रालयाच्या आधिपत्याखाली कंपनी कायदा अधिनियम १९५६ च्या अनु. क्र. २५ च्या अंतर्गत दि. १३ जानेवारी १९९२ रोजी "राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ" स्थापन करण्यात आले आहे. यांच्या विविध कल्याणकारी योजनाची "अधिकृत वाहिनी" म्हणून या योजना राज्यात तर राज्याची "अधिकृत वाहिनी" म्हणून या योजना जिल्हयात राबविण्याचे काम विकासात्मक महामंडळ करीत आहे.

१. इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक व सर्वांगीण उन्नतीकरिता त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन देणे.

२. शासनाच्या यंत्रणेमार्फत उपरोक्त कारणाकरिता मागासवर्गीय व्यक्ती/समाजाकरिता नियमित मिळकत अथवा महामंडळाने ठरविलेल्या आर्थिक निकषांच्या आधारे संबंधितांना अर्थसहाय्य करणे.

३. स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहीत करणे.

४. दारिद्रयरेषेखालील व्यक्तीकरिता नियमित मिळकत प्राप्त होण्याच्या दृष्टीने स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य करणे.

५. व्यावसायिक अथवा तंत्रशिक्षण प्रशिक्षणाकरिता अर्थसहाय्य करणे.

६. स्वयंरोजगारातून निर्मिलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध प्रदर्शन, मेळाव्याचे आयोजन करणे.

या वरील उद्दिष्ट पूर्ततेसाठी राष्ट्रीय स्तरावरील व जिल्हयातील विकासात्मक महामंडळे ही कार्यरत आहेत.[५६]

**केंद्र शासन पुरस्कृत योजना**

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) याकरिता केंद्र शासनाच्या विशेष अर्थसहाय्यांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनामधील एक योजना म्हणजेच मुदती कर्ज योजना ही होय.

**१. मुदती कर्ज योजना**

या योजनेअंतर्गत जिल्हयातील इतर मागासवर्गीय समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना स्वयंरोजगार उभारणीसाठी राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ व जिल्हयातील विकासात्मक महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत लाभधारकाला छोट्या अथवा मोठ्या स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ३,००,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**विकासात्मक महामंडळाचा सहभाग**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील विकासात्मक महामंडळाचा आहे.

दोन्ही महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकाला स्वत:ला करावा लागतो.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ व जिल्हयातील विकासात्मक महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ६ टक्के व्याजदर आकारला जातो. यामध्ये राज्यपातळीवरील महामंडळाकडून व राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाकडून वाटप करण्यात आलेल्या रक्कमांची, लाभधारकांची आकडेवारी ही तक्ता क्रमांक ४.२८ मध्ये दिली आहे.[५७]

**तक्ता क्रमांक ४.२८**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि. जिल्हा कायार्लय कोल्हापूर १९९९-२००० पासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत वर्षनिहाय लाभधारकांची माहिती**

| अ. नं. | वर्ष | लाभधारकांची संख्या | राज्य महामंडळाची वाटप रक्कम | राष्ट्रीय महामंडळाची वाटप रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० ते २००५-०६ | ३५ | रू. २,७७,००० | रू. ३४.२१,००० |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली वर्षनिहाय माहिती पान नं. ३

वरील तक्त्यावरून असे दिसून आले की, या योजनेअंतर्गत महामंडळाच्या सुरूवातीपासून (१९९९-२०००) ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत जिल्हयातील ३५ लाभधारक व्यक्तीना कष्टार्जित मिळकतीचे मार्ग उभारणीस विकासात्मक महामंडळाने ५ टक्के रक्कमेच्या सहभागाअंतर्गत रू. २,७७,००० इतक्या रक्कमेचा सहभाग दर्शविला तर राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या ९० टक्के रक्कमेच्या सहभागाअंतर्गत रू. ३४,२१,००० इतक्या रक्कमेचे वाटप केले आहे. म्हणजेच महामंडळाने एकूण रू. ३६,९८,०००/- खर्च केले.

या योजनेअंतर्गत विकासात्मक महामंडळ हे जिल्हयातील प्रत्येक वर्षाकाठी जवळजवळ १० ते २० लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून देऊन उजाडलेली घरटी सावरण्याची एकमेव संधी स्वयंरोजगाराद्वारे उपलब्ध करून देत आहे.[५८]

## २. मार्जिन मनी योजना

इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारकांना राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, जिल्हयातील विकासात्मक महामंडळ, स्थानीय राष्ट्रीयकृत बँका यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योग-व्यवसाय उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत वरील योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत लहान अथवा मोठ्या स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) लाभधारकांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५,००,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ४० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील विकासात्मक महामंडळाचा असतो.

**लाभधारकांचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकाला समाविष्ट करावा लागतो.

**बँक कर्ज**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील वरील सर्वांचा सहभाग वगळता उर्वरित ५० टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील स्थानीय पातळीवरील राष्ट्रीयकृत बँकामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

बँकेमार्फत देण्यात येणा-या कर्जावर बँक आपल्या नियमाप्रमाणे व्याजदराची आकारणी करते. विकासात्मक महामंडळामार्फत व राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ६ टक्के व्याजदर आकारला जातो.

**कर्जाची परतफेड**

कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही बँकांच्या नियमाप्रमाणे, बँकांनी ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये करावी लागते.

या योजनेअंतर्गत मुख्यत: ज्या प्रकल्पातून मालमत्ता निर्माण होईल, त्याचे तारण होईल असे रू. ३,००,००० पेक्षा मोठ्या मशिनरी संबंधीचे प्रकल्प मान्यताप्राप्त होतात अथवा घेण्यात येतात. राष्ट्रीय स्तरावरील या योजनेचा लाभ जिल्हयातील किती लाभधारकांना घेता आल याचा आढावा तक्ता क्रमांक ४.२९ च्या आधारे घेऊया.[५९]

**तक्ता क्रमांक ४.२९**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि. जिल्हा कार्यालय कोल्हापूर १९९९-२००० पासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत वर्षनिहाय लाभधारकांची माहिती**

| अ. नं. | वर्ष | लाभधारकांची संख्या | राज्य महामंडळाची वाटप रक्कम | राष्ट्रीय महामंडळाची वाटप रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० ते २००५-०६ | २ | रू. ४६,७८४ | रू. ३,७४,२६९ |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली माहिती पान नं. ४

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, या योजनेअंतर्गत महामंडळाच्या सुरूवातीपासून (१९९९-२०००) ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत जिल्हयातील २ लाभधारकांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला गेला आहे. यासाठी राज्य महामंडळाच्या ५ टक्के रक्कमेच्या सहभागापैकी महामंडळाने रू. ४६,७८४ इतक्या रक्कमेचे वाटप केले आहे तर राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या ४० टक्के रक्कमेच्या सहभागापैकी महामंडळाने रू. ३,७४,२६९ इतक्या रक्कमेचे वाटप केले आहे. परंतु या योजनेअंतर्गत बँक कर्ज अधिक ५० टक्के रक्कमेचे, तर राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाचा सहभागही अत्यल्प रक्कमेचा असल्याने लाभधारकांना ते

गैरसोयीचे वाटत असल्याने त्यांच्या लाभाबाबत लाभधारक हे उदासिन राहत आहेत. याचा परिणाम म्हणून निव्वळ दोनच लाभधारकांनी याचा लाभ घेतला आहे.[६०]

### ३. सूक्ष्म पतपुरवठा योजना

जिल्हयात जवळजवळ तीन ते चार वर्षापासून कार्यरत असलेलया कोल्हापूर महिला विकास संस्था, युवा ग्रामीण विकास संस्था यासारख्या नोंदणीकृत अशासकीय स्वयंसेवी संस्था आणि त्यांनी विकसित केलेल्या स्वयंसहाय्यता गटातील इच्छुक लाभधारकांना व्यवसायवृध्दी अथवा स्वयंरोजगारासाठी विकासात्मक महामंडळ हे सूक्ष्म पतपुरवठा योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहेत.

जिल्हयातील ज्या स्वयंसेवी संस्था आपल्या विशिष्ट उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी सतत प्रयत्नरत असतात ती उद्दिष्टे पुढीलप्रमाणे वर्णन करता येतील.

१. गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, शिष्यवृत्त्या इ.

२. वैद्यकीय तपासणी केंद्र उभारणे

३. व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे

४. महिलांची डेअरी योजना राबविणे

५. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयंसहाय्यत्ता गट (SHG) ची स्थापना करणे

६. स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना राबविणे

७. आदीवासी विकासाची कामे करणे, कुपोषित महिला व बालके याबाबत योजना राबविणे

८. बचतगटाची स्थापना करून महिलांना स्वयंरोजगार उभारणीस सहाय्य करणे

९. बचत गटाचे जाळे तळागाळातील महिलांपर्यंत प्रोहचविणे

१०. शासकीय योजना राबविणे.

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) याकरिता राष्ट्रीय महामंडळाची (केंद्र शासनाच्या विशेष अर्थसहाय्यांतर्गत) राबविण्यात येणारी सूक्ष्म पतपुरवठा योजना ही त्यापैकी एक असून मान्यताप्राप्त अशासकीय संस्थांनी (NGOs) विकसित केलेल्या स्वयंसहाय्यता गटा (SHGs) मधील इच्छुक लाभधारकांना व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

या योजनेअंतर्गत वरील प्रकारच्या योजनेतील व्यवसायाच्या स्वरूपाप्रमाणेच ह्याही योजनेअंतर्गत विविध प्रकारच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे स्वयंसेवी संस्थामार्फत लाभधारकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील लाभधारक व्यक्ती (कुटुंब) यांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही स्वयंसेवी संस्थाना रू. ५,००,००० पर्यंत, स्वयंसेवी संस्थामार्फत किमान ५० लाभधारकांना वैयक्तिक कर्ज रू. २०,००० पर्यंत (अर्थसहाय्य) उपलब्ध करून दिले जाते.[६१]

## राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग

वैयक्तिक लाभार्थी कर्ज मर्यादेतील रक्कमेच्या ९५ टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

## लाभधारकाचा सहभाग

वैयक्तिक लाभार्थी कर्ज मर्यादेतील रक्कमेच्या निव्वळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग लाभधारकाला स्वत:ला करावा लागतो.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाकडून संस्थेला दयावयाच्या कर्जावर द. सा. द. शे. ५ टक्के व्याजदर आकारला जातो.

## कर्जाची परतफेड

लाभधारकाला आपल्या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही दोन वर्षाच्या (२४ महिने) कालावधीमध्ये स्वयंसेवी संस्थाकडे करावी लागते.

नियमित कर्जफेड करणा-या लाभधारकांला अर्धा टक्का इतकी व्याजदरात सवलत दिली जाते.

आपुलकीची, जिव्हाळ्याची आपल्या प्रश्नाची सोडवणूक स्वत: करणारी ही स्वयंसेवी संस्था व त्यांनी निर्माण केलेले स्वयंसहाय्यता गट हे लाभधारकांच्या स्वयंरोजगार, स्वयंरोजगारातून समृध्द जीवनाची वाटचाल घडवून आणण्यास विकासात्मक महामंडळाच्या सहकार्याने प्रयत्नरत आहेत. यामध्ये महामंडळाने आतापर्यंत किती स्वयंसेवी संस्थाना, लाभधारकांना आर्थिक मदत मिळवून दिली आहे त्यांच्या आकडेवारीची माहिती तक्ता क्रमांक ४.३० मध्ये घेऊया.[६२]

**तक्ता क्रमांक ४.३०**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि. जिल्हा कार्यालय कोल्हापूर १९९९-२००० पासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत वर्षनिहाय लाभधारकांची माहिती**

| अ. नं. | वर्ष | स्वयंसेवी संस्थांची संख्या | राष्ट्रीय महामंडळाची वाटप रक्कम (९५ टक्के) |
|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० ते २००५-०६ | १ (२५ लाभधारक) | रू. ५,००,००० |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली माहिती पान नं. ५

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, या योजनेअंतर्गत जिल्हयातील युवा ग्रामीण विकास संस्था, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर या स्वयंसेवी संस्थेला रू. ५,००,००० चा धनादेश हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या ९५ टक्के रक्कमेच्या सहभागांतर्गत जिल्हयातील विकासात्मक महामंडळाने उपलब्ध करून दिला आहे.

स्वयंसेवी संस्थेने निर्माण केलेल्या स्वयंसहाय्यता गटातील किमान २५ लाभधारकांना व्यवसायवृध्दी अथवा स्वयंरोजगारासाठी कर्ज वितरीत केले आहे. संस्थेने कर्ज वितरणानंतर लाभधारकांची यादीसह माहिती महामंडळाकडे पाठविण्याचे निर्बंध हे संस्थांवर बंधनकारक आहेत.

सदर योजनेअंतर्गत जिल्हयातील युवा ग्रामीण विकास संस्था, गारगोटी, जि. कोल्हापूर या स्वयंसेवी संस्थेने जिल्हयात विकसित केलेल्या स्वयंसहाय्यता गटाची नावे ही पुढील तक्ता क्रमांक ४.३१ प्रमाणे वर्णन करता येतील.

**तक्ता क्रमांक ४.३१**

**युवा ग्रामीण विकास संस्था, गारगोटी, जि. कोल्हापूर या स्वयंसेवी संस्थेने जिल्हयात विकसित केलेल्या स्वयंसहाय्यता गटाची नावे**

| अ. नं. | स्वयंसहाय्यता गटाची नावे | गाव/खेडे | स्वयंसहाय्यता गटातील सभासद | महिना बचत | बँक |
|---|---|---|---|---|---|
| १ | जनसेवा स्वयंसहाय्यता गट | आकुर्डे | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| २ | वेदगंगा महिला स्वयंसहाय्यता गट | सोनारवाडी | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| ३ | सर्वोदय दारिद्रयरेषा स्वयंसहाय्यता गट | मडिलगे | ११ | ११ | को.जि.म.स.बॅ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिनी डेअरी संस्था | गारगोटी | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| ५ | शिवशंकर गट | मडिलगे | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| ६ | संजीवनीदेवी महिला स्वयंसहाय्यता गट | कोनवडे | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| ७ | श्रीकृष्ण महिला स्वयंसहाय्यता गट | कोनवडे | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| ८ | संदीप महिला स्वयंसहाय्यता गट | सालपेवाडी | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| ९ | हनुमान स्वयंसहाय्यता गट | कारीवडे | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| १० | विठ्ठल-रूक्मीणी स्वयंसहाय्यता गट | देऊळवाडी | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| ११ | चव्हाण स्वयंसहाय्यता गट | वरपेवाडी | ११ | ३० | को.जि.म.स.बँक |
| १२ | केदारलिंग स्वयंसहाय्यता गट | देऊळवाडी | १० | ३० | को.जि.म.स.बँक |
| १३ | भैरवनाथ स्वयंसहाय्यता गट | पुष्पनगर | ११ | ३० | को.जि.म.स.बँक |
| १४ | कै. जीवन पाटील स्वयंसहाय्यता गट | पेठ शिवपुरी | १० | ३० | को.जि.म.स.बँक |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली यादी पान नं. १-४

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अनेक स्वयंसहाय्यता गट हे जिल्हयातील ह्या युवा ग्रामीण विकास संस्था, गारगोटी मध्ये असून एका गावामध्ये एंक अथवा दोन याप्रमाणे हे स्वयंसहाय्यता गट कार्यरत आहेत.

या स्वयंसहाय्यता गटामध्ये एकूण ८१८ सभासद असून यामध्ये बहुसंख्याकाने स्त्रीया सहभागी असून त्यांनीही स्वयंसहाय्यता गटाचे सभासदत्व हे स्वीकारले आहे.[६३]

## ४. महिलांसाठी स्वर्णिमा योजना

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारक महिलांना घरगुती व्यवसाय अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग-व्यवसाय उभारणीसाठी जिल्हयातील विकासात्मक महामंडळ, राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्णिमा योजनेअंतर्गत लाभधारक महिलांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) समाजातील लाभधारक महिलांना वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५०,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

### राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेतील रक्कमेच्या ९५ टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

### विकासात्मक महामंडळाचा सहभाग

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा विकासात्मक महामंडळाचा असतो.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ जिल्हयातील विकासात्मक महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

### कर्जाची परतफेड

महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही महिलांनी आपल्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीनंतर सहा महिन्यांनी ठराविक हप्त्यात सात वर्षाच्या कालावधीमध्ये करावयाची आहे. यामध्ये किती लाभधारक महिलांना या योजनेचा लाभ घेता आला, त्यासाठी महामंडळाने किती रक्कम खर्च केली याची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.३२ मध्ये दर्शविली आहे.[६४]

**तक्ता क्रमांक ४.३२**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि. जिल्हा कार्यालय कोल्हापूर १९९९-२००० पासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत वाटप केलेल्या लाभधारकांची माहिती**

| अ. नं. | वर्ष | लाभधारकांची संख्या | राष्ट्रीय महामंडळाचे ९५ टक्के रक्कमेचे वाटप | राज्य महामंडळाचे ५ टक्के रक्कमेचे वाटप |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० ते २००५-०६ | २ | रू. १,००,००० | -- |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली माहिती पान नं. ५

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, या योजनेअंतर्गत महामंडळाच्या सुरुवातीपासून ते ३१ मार्च २००६ पर्यंत दोन लाभधारक महिलांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून दिला. त्यासाठी राष्ट्रीय महामंडळाच्या ९५ टक्के रक्कमेच्या सहभागात रू. १,००,००० इतक्या रक्कमेचे वाटप केले आणि महिलांच्या मागणीप्रमाणे शिलाई मशीन, म्हैस, शेळ्या-मेंढ्या इ. जनावरांच्या पालनासाठी त्यांना अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार या महामंडळाने लावला.[६५]

## ५. व्यावसायिक व अभियांत्रिकी शिक्षण कर्ज योजना

इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) लाभधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, आरोग्य विज्ञान विषयक शिक्षण, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि संगणक शिक्षण यासारख्या केंद्रीय परिषदांनी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ व जिल्हयातील विकासात्मक महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

वरील अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीची शैक्षणिक खर्च गुंतवणूक मर्यादा ही रू. ७५,००० प्रतिवर्ष वा संपूर्ण कोर्सकरिता जास्तीत जास्त रू. ३,००,००० पर्यंतची मर्यादित असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

### राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग

विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रशिक्षणाकरिता प्रतिवर्ष वा संपूर्ण कोर्सकरिता आवश्यक असलेल्या खर्चाच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा महामंडळाचा असतो.

## विकासात्मक महामंडळाचा सहभाग

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रशिक्षणाकरिता प्रतिवर्ष वा संपूर्ण कोर्सकरिता आवश्यक असलेल्या खर्चाच्या निव्वळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा महामंडळाचा असतो.

वरील दोन्ही विकासात्मक महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जावर द. सा. द. शे. ४ टक्के व्याजदर आकारला जातो.

## कर्जाची परतफेड

महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे शिक्षण प्रशिक्षणानंतर सहा महिन्याच्या कालावधीमध्ये करता येते. तसेच स्वयंरोजगार प्राप्तीनंतर पाच वर्षाच्या कालावधीत मासिक हप्त्यात करता येते. यामध्ये महामंडळाने आतापर्यंत किती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासास हातभार लावला आणि महामंडळाने त्यासाठी किती रक्कम खर्च केली यासंबंधीच्या आकडेवारीचा विचार तक्ता क्रमांक ४.३३ मध्ये करूया.[६६]

**तक्ता क्रमांक ४.३३**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि. जिल्हा कार्यालय कोल्हापूर १९९९-२००० पासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत वर्षनिहाय माहिती**

| अ. नं. | वर्ष | लाभधारक संख्या | राष्ट्रीय महामंडळाचे ९० टक्के रक्कमेचे कर्ज वाटप | राज्य महामंडळाचे ५ टक्के रक्कमेचे कर्ज वाटप |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० ते ३१ मार्च २००६ | ३५ | रू. १४,४८,६८० | रू. ३१,३२० |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली माहिती पान नं. ४

वरील तक्त्यावरून असे दिसून आले की, या योजनेअंतर्गत महामंडळाच्या सुरुवातीपासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत जिल्हयातील ३५ लाभधारक विद्यार्थ्यांना, व्यावसायिक व अभियांत्रिकी शिक्षण कर्ज योजनेअंतर्गत विविध प्रकारच्या व्यावसायिक व अभियांत्रिकी शिक्षणासाठी राष्ट्रीय महामंडळाने रू. १४,४८,६८० इतक्या रक्कमेचे, राज्य

महामंडळाने रू. ३१,३२० इतक्या रक्कमेचे वाटप केले आहे. जिल्हयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासास अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावला आहे.[६७]

## ६. महिला समृध्दी योजना

इतर मागासवर्गीय लाभधारक महिलांना एखाद्या विशिष्ट प्रकारच्या सामुदायिक अथवा वैयक्तिक स्वरूपाच्या उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी जिल्हयातील विकासात्मक महामंडळ, राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला समृध्दी योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत महिलांना घरगुती स्वरूपाचे कुटीर उद्योग अथवा लघु उद्योग असे मिळकतीचे कष्टार्जित मार्ग मिळवून देण्यासाठी विकासात्मक महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

जिल्हयातील इतर मागासवर्गीय लाभधारक महिलांना सरळ अथवा स्वयंसहाय्यता बचत गट (SHG) च्या माध्यमातून वरील प्रकारचे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही स्वयंसहाय्यता बचत गटाना रू. ५,००,००० पर्यंत तर एका बचत गटातील जास्तीत जास्त २० महिलांना जास्तीत जास्त प्रत्येकी रू. २५,००० पर्यंतचे असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.[६८]

### राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग

वैयक्तिक महिला लाभधारकांना कर्ज मर्यादेतील रक्कमेच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा असतो.

### विकासात्मक महामंडळाचा सहभाग

राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा राज्य विकासात्मक महामंडळाचा असतो.

### लाभधारक महिलांचा सहभाग

वरील दोन्ही महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित निव्वळ ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारक महिलांना स्वत:ला करावा लागतो.

**कर्जाची परतफेड**

लाभधारक महिलांना कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही सर्वसाधारणपणे दोन वर्षाच्या (२४ महिन्याच्या) कालावधीमध्ये करावी लागते.

जिल्हयातील प्रत्येक महिलांना अथवा स्वयंसहाय्यता बचत गटांना या योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न हा विकासात्मक महामंडळाकडून सतत केला जात आहे. यामध्ये महामंडळाने आतापर्यंत स्वयंसहाय्यता बचत गटाना, महिलांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे त्यांची आकडेवारी तक्ता क्रमांक ४.३४ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्रमांक ४.३४**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लि. जिल्हा कार्यालय कोल्हापूर १९९९-२००० पासून ते ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत वर्षनिहाय लाभधारकाची माहिती**

| अ. नं. | वर्ष | स्वयंसहाय्यता बचत गट | राज्य महामंडळाचा ५ टक्के रक्कमेचा सहभाग | राष्ट्रीय महामंडळाचा ९० टक्के रक्कमेचा सहभाग |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० ते ३१ मार्च २००६ | १ (१० लाभधारक) | रू. १२,५०० | रू. २,३७,५०० |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाने दिलेली माहिती पान नं. ७

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, या योजनेअंतर्गत जिल्हयातील एका स्वयंसहाय्यता बचत गटाला रू. २,३७,५०० इतक्या रक्कमेचा धनादेश राष्ट्रीय महामंडळामार्फत, तर राज्य महामंडळामार्फत रू. १२,५०० इतक्या रक्कमेचे वाटप हे विकासात्मक महामंडळामार्फत जिल्हयातील १० लाभधारक महिलांना उपलब्ध करून दिले आहे.[६९]

## ७. स्वयंसहाय्यता योजना

जिल्हयातील इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) लाभधारकाने विशिष्ट प्रकारचे व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास त्या अनुषंगाने उद्योग अथवा व्यवसाय उभारणीसाठी जिल्हयातील विकासात्मक महामंडळ व राष्ट्रीय स्तरावरील महामंडळ

यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंसक्षम योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेअंतर्गत डॉक्टर्स, वास्तुविशारद, इंजिनिअरिंग, लेखाविषयक, कॉस्ट अकौंटंट, हॉटेल मॅनेजमेंट, जेनेटिक होम केअर, जाहिरात व्यवसायातील तंत्रज्ञ, वास्तू सेवा अथवा वास्तुविशारद, सुरक्षा रक्षक एजन्सी, फॅशन डिझायनिंग, स्पर्धात्मक परीक्षा कोचिंग क्लासेस, कल्चर व टुरिझम विकास, प्रिंटिंग प्रेस, डी. टी. पी., ग्राफीक्स, ज्वेलरी डिझायनिंग, ब्युटी पार्लर, फिटनेस सेंटर, दगडी/धातू मूर्ती बनविणारे इ. स्वरूपाचे व्यावसायिक शिक्षण पूर्ण केलेल्या लाभधारकांना व्यवसाय उभारणीसाठी महामंडळ हे अर्थसहाय्यरूपी मदतीचा हातभार लावीत आहे.

इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) लाभधारकाने व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण पूर्ण केलेल्या त्या अनुषंगाने व्यवसाय उभारणीसाठी लागणारी प्रकल्प गुंतवणूक मर्यादा ही रू. ५,००,००० पर्यंतची असल्यास पुढीलप्रमाणे कर्ज मिळते.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचा सहभाग**

प्रकल्प गुंतवणूक मर्यादेच्या ९० टक्के रक्कमेचा सहभाग हा राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाचा असतो.

राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा जिल्हयातील विकासात्मक महामंडळाचा असतो.

**लाभधारकांचा सहभाग**

वरील दोन्ही महामंडळाचा सहभाग वगळता उर्वरित ५ टक्के रक्कमेचा सहभाग हा लाभधारकाला स्वतःला करावा लागतो.

**कर्जाची परतफेड**

सदर कर्जाच्या रक्कमेची परतफेड ही जास्तीत जास्त पाच वर्षाच्या कालावधीमध्ये करावी लागते.

सदर योजनेद्वारे सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याची स्वर्णसंधी हे महामंडळ उपलब्ध करून देत आहे.

जिल्हयातील विकासात्मक महामंडळामार्फत राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाच्या योजनांची अंमलबजावणी ही जिल्हयात परिणामकारकरित्या होवू शकली नाही. जिल्हयातील लाभधारकांनी या योजनांचा लाभ घेतला. अधिक रक्कमेच्या कर्जाद्वारे वाहन खरेदी अथवा व्यवसाय उभारणी केली. परंतु कर्जाची रक्कम आणि व्याजाच्या भरपाईबाबत मात्र ते उदासीन राहू लागले. महामंडळाच्या कर्मचा-यांनी या वसुलीसाठी सतत पाठपुरावा करून वेळ आणि महामंडळाचा पैसा खर्च केला. तरीही लाभधारकांकडून वसुलीस म्हणावा तसा प्रतिसाद लाभला नाही. अत्यंत कमी व्याजदरामुळे ते बेफिकीरवृत्तीने वागतात. महामंडळाच्या या वसुलीच्या अभावाचा परिणाम म्हणून महामंडळास केंद्राकडून वेळोवेळी आवश्यक असलेला निधी हा उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदर योजनांची कर्ज प्रकरणे ही आज विकासात्मक महामंडळाकडून फारशा प्रमाणात मंजूर होत नाहीत तर या योजनांचे काम सध्या रखडतच चाललेले आहे.[७०]

१. विकासात्मक महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनाकडे तुलनात्मक दृष्टिकोनातून पाहता राज्य शासन पुरस्कृत बीज भांडवल योजना ही उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळामार्फत राबविली जात असून अनुसूचित जातीसाठी कार्यरत असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, महाराष्ट्र चमोर्द्योग व चर्मकार विकास महामंडळ यांच्यामार्फत स्वयंरोजगार उभारणीसाठी लाभधारकांना रू. २,००,००० पर्यंतचे अर्थसहाय्य (रू. १०,००० पर्यंतच्या अनुदानासह) उपलब्ध करून दिले जात आहे. विमुक्त व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या वसंतराव नाईक विमुक्त व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ यांच्यामार्फत लाभधारकांना रू. ५,००,००० पर्यंतचे अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहेत. परंतु अनुदानाची सोय मात्र शासनाने ह्या महामंडळाना देवू केली नाही. शिवाय इतर महामंडळांच्या व्याजाचा दर

पाहता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाचा दर हा २ टक्के अधिक म्हणजेच ६ टक्के इतका आहे.

२. विकासात्मक महामंडळाच्या महात्मा फुले, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांच्यामार्फत प्रशिक्षण योजना राबविली जाते. उर्वरित दोन्ही महामंडळामार्फत मात्र ह्या योजना राबविल्या जात नाहीत. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत ३ ते ६ महिन्याचे प्रशिक्षण हे उपलब्ध करून दिले जात आहे. यासाठी महामंडळ हे वाहनचालक रू. १५००/-, ब्युटी पार्लर रू. २५००/-, सर्वसाधारण प्रशिक्षण रू. २२५०/- इतक्या रक्कमेची लाभधारकांची प्रशिक्षण फी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांत भरते. तर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत ६ ते १२ महिन्यांचे प्रशिक्षण हे उपलब्ध करून दिले जाते. यासाठी महामंडळ हे चारचाकी वाहन रू. २३००/-, तीनचाकी वाहन रू. २०००/-, संगणक प्रशिक्षण रू. ३५००/-, ब्युटी पार्लर रू. ३५००/-, शिवण कला रू. १२००/- व सर्वसाधारण प्रशिक्षण रू. २५००/- फी औद्योगिक संस्थांमध्ये भरते.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळापेक्षा लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे लाभधारकांच्या प्रशिक्षणासाठी अधिक रक्कम खर्च करीत आहे.

३. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत सफाई कामगारांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी प्रशिक्षण व पुनर्वसन योजना ही एक अभिनव प्रकारची योजना राबविण्यात येत असून मोफत प्रशिक्षण व विद्यावेतनाशिवाय साधनसामग्री खरेदीकरिता रू. २०००/- पर्यंतचे अनुदानही महामंडळ उपलब्ध करून देत आहे. अशा प्रकारची ही योजना अन्य कोणत्याही महामंडळामार्फत राबविण्यात येत नाही.

४. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी सॅनिटरी मार्ट - स्वच्छता सेवा केंद्र या सामूहिक गट योजनेअंतर्गत मोफत व्यावसायिक प्रशिक्षण विद्यावेतनासह, साधनसामग्रीकरिता रू. २०००/- पर्यंतचे अनुदान लाभधारकांना महामंडळ उपलब्ध करून देत आहेच. शिवाय बेरोजगांरानी गट निर्माण केल्यास गटातील प्रत्येक सदस्याला अनुदानासह रू. २०,०००/- चे अर्थसहाय्य उपलब्ध करून देवून स्वयंरोजगार उभारणीसाठी इतर चारही महामंडळापेक्षा ह्या महामंडळाने विशेष प्रकारची अभिनव योजना राबविली आहे.

५. उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळामार्फत मुदती कर्ज योजनाही राबविली जाते. परंतु महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व महाराष्ट्र चमोद्योग व चर्मकार विकास महामंडळ ही राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाची योजना ही जिल्हयात राबविते. राष्ट्रीय स्तरावरील महामंडळ हे तिन्ही महामंडळामार्फत रू. ३०,००,००० ह्या समान रक्कमाचे अर्थसहाय्य लाभधारकांना उपलब्ध करून देत आहे. परंतु त्यांच्या व्याजदराबाबत मात्र तफावत असून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचा व्याजदर ४ टक्के, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचा अनुक्रमे ६ टक्के व ८ टक्के तर महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा ७ टक्के व ९ टक्के इतका आहे. उर्वरित दोन्ही विकासात्मक नहामंडळे, राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाची मुदती कर्ज योजना जिल्हयात राबवित आहेत. राष्ट्रीय स्तरावरील महामंडळ हे वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत रू. ५,००,००० तर रू. ३,००,००० महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून देत आहे. राष्ट्रीय महामंडळाच्या अर्थसहाय्याच्या

रक्कमेत तफावत असली तरी व्याजदराबाबत समानता असून दोन्ही विकासात्मक महामंडळामार्फत ६ टक्के व्याजदराची आकारणी केली जाते.

६. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांच्यामार्फत सहकारी संस्थांचे भाग खरेदीकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे. तुलनात्मकदृष्ट्या पाहता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत अधिक रक्कमेचे (अनुदानासह), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत कमी रक्कमेचे (अनुदानासह) अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे. उर्वरित तिन्ही महामंडळामार्फतही कल्याणकारी योजना राबविली जात नाही.

७. उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा अपवाद वगळता उर्वरित तिन्ही विकासात्मक महामंडळामार्फत शैक्षणिक कर्ज योजना राबविली जाते. परंतु वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ ही राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाची योजना राबवितात. राष्ट्रीय महामंडळ ह्या दोन्ही विकासात्मक महामंडळामार्फत रू. ७५,००० ते रू. ३,००,००० पर्यंतचे समान रक्कमेचे अर्थसहाय्य ४ टक्के या समान व्याजदराने उपलब्ध करून देत आहे. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत ही वरील दोन्ही विकासात्मक महामंडळाप्रमाणेच समान रक्कमेचे अर्थसहाय्य, व्याजदराबाबतही समानता असलेली आहे. परंतु ही योजना राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणारी आहे.

८. विकासात्मक महामंडळामध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कलागुणांची कदर करणारे, त्यांच्या शिक्षणविषयक वाढीस प्रोत्साहन देणारी शिष्यवृत्ती योजना ही विशेष योजना राबवित आहे. इतर चारही विकासात्मक महामंडळे मात्र अशा कल्याणकारी योजनाबाबत उदासीन आहेत.

९. विकासात्मक महामंडळातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत अनुदान योजना ही राबविली जात असून या योजनेअंर्तगत लाभधारकांना किमान रू. १०,०००/- पर्यंत अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे. स्वयंरोजगार उभारणीस हातभार लावला जात आहे. परंतु उपरोक्त तिन्ही महामंडळाप्रमाणे वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या लाभधारकांना मात्र अनुदानावाचून वंचित ठेवण्यात आले आहे. वास्तविक ह्याही महामंडळाच्या लाभधारकांना स्वयंरोजगार उभारणीस अनुदानरूपी अर्थसहाय्याची आवश्यकता असता शासनाने मात्र त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

१०. विकासात्मक महामंडळामध्ये वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ हे लाभधारकांची बँक व्यवहाराच्या त्रासातून मुक्तता करून देणारे व इतर महामंडळाच्या योजनेतील व्याजदराच्या तुलनेत अत्यल्प २ टक्के व्याजदराने थेट महामंडळामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करून देणारी इतर महामंडळापेक्षा अलग अशी ही योजना ह्या महामंडळाकडून राबविली जाते

११. उपरोक्त पाचही विकासात्मक महामंडळे लाभधारकांना (महिला व पुरुष) लाभ उपलब्ध करून देण्यास प्रयत्नरत आहेत. परंतु वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे मागासवर्ग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर

मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ हे महिलांकरिता विशेष महिला समृध्दी योजना, स्वर्णिमा योजना यासारख्या विशेष महिलांकरिता योजना राबवून त्यांना अत्यल्प व्याजदराने अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे. याबाबत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे मात्र दुर्लक्ष झाले आहे.

१२. महिला समृध्दी योजनेद्वारे अत्यल्प व्याजदराने अर्थसहाय्य शिवाय अनुदानही उपलब्ध करून दिले आहे. तसेच या महामंडळाने विशेषत: विधवा, परितक्त्या, निराधार महिलांना प्राधान्यक्रम देऊन इतर महामंडळापेक्षा एक वेगळे वैशिष्ट्य हे निर्माण केले आहे. महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत मोठे प्रकल्प गुंतवणूक रक्कमेचे स्वयंरोजगार उभारणीस हे महामंडळ अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे. परंतु इतर महामंडळाशी तुलनात्मक दृष्टिकोनातून पाहता लाभधारकांना या अर्थसहाय्य उपलब्धतेबाबत दीर्घकाळाची प्रतीक्षा करावी लागते. कारण ह्या महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय जिल्हयात कार्यरत नाही.

१३. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ ही राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाची योजना ही जिल्हयात राबविते. राष्ट्रीय स्तरावरील महामंडळ हे दोन्ही महामंडळामार्फत रू. ५,००,००० ह्या समान रक्कमाचे समान ५ टक्के व्याजदरासह अर्थसहाय्य उपलब्ध करून देत आहे. महामंडळाची ही योजना स्त्युत्य आहे. परंतु इतर तिन्ही विकासात्मक महामंडळे ही ह्या स्वयंसक्षम योजनेसारख्या कल्याणकारी योजनेबाबत मात्र उदासीन आहेत असेच म्हणावे लागेल.

१४. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत पाच किलोमीटर परिसरात बँकासारख्या आर्थिक सोयी उपलब्ध नाहीत अशा परिसरातील गरजवंत लाभधारकांना अर्थसहाय्याचा लाभ उपलब्ध

करून देण्यासाठी सूक्ष्म पतपुरवठा योजना ही अभिनव योजना हे विकासात्मक महामंडळ राबवित आहे. तुलनात्मकदृष्ट्या अशा प्रकारची ही विशेष अभिनव योजना इतर कोणतेही महामंडळ राबवित नाही.

१५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ हे जिल्हयातील स्वयंसेवी संस्था व त्यांनी निर्माण केलेले स्वयंसहाय्यता गट, यामधील इच्छुक लाभधारकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य हे विकासात्मक महामंडळ करीत आहे. स्वयंसेवी संस्था अथवा गटामार्फत लाभधारकांपर्यंत पोहचण्याचे स्त्युत्य असे कार्य हे विकासात्मक महामंडळ करीत आहे. तुलनात्मकदृष्ट्या अशा प्रकारची योजना उपरोक्त चारही महामंडळाकडून राबविली जात नाही.

एकंदरीतच पाचही विकासात्मक महामंडळाची उद्दिष्टे, कार्यक्रम आणि योजना लक्षात घेतल्यास या सगळ्या विकासात्मक महामंडळाची उद्दिष्टे, कार्यक्रम आणि योजना ह्या सारख्याच दिसतात. मात्र विकासात्मक महामंडळाचे लाभधारक घटक तेवढे वेगळे आहेत. याचाच अर्थ प्रशासकीय यंत्रणेने विशिष्ट लोकसमुदायाच्या विकासाबद्दलच्या कार्यक्रमाचा आराखडा तयार करताना आणि त्यांची अंमलबजावणी करताना प्रत्येक लाभधारक घटकांच्या आणि त्यांच्या विशिष्ट गरजाबद्दलच्या बाबीकडे जास्त लक्ष देवून कार्यक्रमाचा (योजना) आराखडा ठरविला गेला नाही असेच म्हणावे लागेल.

**प्रस्तुत काळातील महामंडळांच्या समस्या**

विकासात्मक महामंडळाच्या या महत्त्वपूर्ण योगदानामध्ये महामंडळाना आपण करीत असलेल्या या प्रामाणिक प्रयत्नांमध्ये काही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्या समस्या ह्या मुख्यतः पुढीलप्रमाणे वर्णन करता येतील.

१. विकासात्मक महामंडळाना आपल्या दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेला पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने विकासात्मक महामंडळांना ह्या अपु-या कम्रचारी वर्गावरच समाधान मानून कामाचा व्याप सांभाळण्याची कसरत करावी लागत आहे.

२. विकासात्मक महामंडळाना आपले काम अधिक सक्षम, गतिमानरित्या करता यावे यासाठी संगणक अथवा स्वतंत्र संगणक कक्ष व त्यासाठी आवश्यक असलेला प्रशिक्षित कर्मचारी आवश्यक आहे. जेणेकरून या विकासात्मक महामंडळाना आपले काम अधिक गतिमान व प्रभावशालीरित्या पार पाडता येईल.

३. चारही विकासात्मक महामंडळाचे कार्य हे एकाच कार्यालयीन इमारतीमध्ये चालविले जात आहे. वास्तविक प्रत्येक विकासात्मक महामंडळाची स्वतंत्र कार्यालयीन इमारत असणे आवश्यक आहे. जेणेकरून ते लाभधारक व महामंडळाच्यादृष्टीने सोयीचे ठरेल.

४. विकासात्मक महामंडळाच्या योजनाद्वारे लाभधारक लाभ उपलबध करून घेतात पण त्याच्या परतफेडीबाबत मात्र ते उदासिनता दर्शवितात. लाभधारक आर्थिकदृष्ट्या किमान समक्षम बनला तरीही उदासिनता दर्शवितात. याचाच परिणाम म्हणून बँक व महामंडळे ही अडचणीत येतात.

५. विकासात्मक महामंडळाना लाभधारकाकडून वेळच्यावेळी वसुली अभावी शासनाकडून वेळोवेळी निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे विकासात्मक महामंडळे ही दोन्ही बाजूनी अडचणीत येतात.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने लाभ
ना दिलेली मिनी रिक्षा वाहन.




महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास
महामंडळाने केलेले अर्थसहाय्य न लाभार्थीनी उभारलेला व्यव
साय




महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळामार्फत लाभार्थींना अर्थसहाय्य




युवा ग्रामीण विकास संस्था गारगोटी जि. कोल्हापूर या सेवाभावी संस्थेमार्फत स्वंयसहाय्यता गटातील महीलांना अर्थसहाय्य.

## संदर्भ सूची


१. विकासात्मक महामंडळाच्या माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८ पृ.१

२. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

३. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय माहिती, १९७८ ते २००५, पृ. १ ते ७

४. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली तालुकानिहाय साध्य उद्दिष्टांची माहिती, पृ. १

५. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय अर्जांची माहिती, पृ. १ ते १०

६. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांची मुलाखत दि.२८/१२/२००५,दि.३/१/२००६,दि.१८/१/२००६,दि.२७/१/२००६,दि.८/२/२००६, दि.१६/५/२००६

७. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली लाभधारकांची यादी, पृ. १ ते ६

८. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

९. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय माहिती, १९७८ ते २००५, पृ. १ ते ७

१०. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

११. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय माहिती, १९७८ ते २००५, पृ. १ ते ७

१२. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

१३. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय माहिती, १९७८ ते २००५, पृ. १ ते ७

१४. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

१५. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय माहिती, १९७८ ते २००५, पृ. १ ते ७

१६. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

१७. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय माहिती, १९७८ ते २००५, पृ. १ ते ७

१८. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

१९. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

२०. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय माहिती, १९७८ ते २००५, पृ. १ ते ७

२१. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

२२. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

२३. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७८, पृ. ४ ते १०

२४. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली वर्षनिहाय माहिती, १९७८ ते २००५, पृ. १ ते ७

२५. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

२६. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, पृ. १, २

२७. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

२८. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, पृ. १, २

२९. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

३०. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

३१. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

३२. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

३३. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

३४. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

३५. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

३६. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक मुलाखत दि. ५/६/२००६, दि. २१/६/२००६ दि. २९/६/२००६, दि. ३/७/२००६, दि. ११/७/२००६, दि. १९/७/२००६

३७. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, १९८५ ते २००६, पृ. १, २

३८. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

३९. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली लाभधारकांची यादी, पृ. १ ते ६

४०. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, १९८५ ते २००६, पृ. १, २

४१. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, १९८५ ते २००६, पृ. १, २

४२. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

४३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

४४. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, १९८५ ते २००६, पृ. १, २

४५. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

४६. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

४७. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, १९८५ ते २००६, पृ. १, २

४८. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

४९. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापकांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, १९८५ ते २००६, पृ. १, २

५०. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९८२, पृ. २ ते ४

५१. महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित मुंबई, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७४

५२. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ दिनदर्शिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, २००६, पृ. १ ते १२

५३. मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९९९, पृ. १ ते ४

५४. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, २००० ते २००५, पृ. २ ते ५

५५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली लाभधारकांची यादी, पृ. १ ते १०

५६. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ दिनदर्शिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, २००६, पृ. १ ते १२

५७. मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९९९, पृ. १ ते ४

५८. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, २००० ते २००५, पृ. २ ते ५

५९. मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९९९, पृ. १ ते ४

६०. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, २००० ते २००५, पृ. २ ते ५

६१. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ दिनदर्शिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, २००६, पृ. १ ते १२

६२. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९९९, पृ. १ ते ४

६३. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, २००० ते २००५, पृ. २ ते ५

६४. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९९९, पृ. १ ते ४

६५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, २००० ते २००५, पृ. २ ते ५

६६. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९९९, पृ. १ ते ४

६७. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, २००० ते २००५, पृ. २ ते ५

६८. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ माहितीपुस्तिका, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९९९, पृ. १ ते ४

६९. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक यांनी पुरविलेली योजनांची वर्षनिहाय माहिती, २००० ते २००५, पृ. २ ते ५

७०. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, जिल्हा व्यवस्थापक मुलाखत दि. १७/६/२००६, दि. ४/९/२००६, २०/९/२००६, दि. १२/१०/२००६, दि. १०/११/२००६, दि. १९/१२/२००६